


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०२९ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# शहांच्या दट्ट्यानंतर भाजपचे एक पाऊल मागे!

## महापालिकेसाठी शिवसेनेशी युतीची घोषणा



**नागपूर/मुंबई : (समर्थ गांवकरी)**

कल्याण-डोंबिवलीमध्ये पक्ष प्रवेशांच्या वादातून शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये निर्माण झालेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना पाचारण करून योग्य तो संदेश दिल्यानंतर भाजपने नरमाईची भूमिका घेतली आहे. चव्हाण यांनी लगेचच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यानंतर मुंबई, ठाण्यातील निवडणुका महायुतीतून लढविल्या जातील, असे चव्हाण यांनी शुक्रवारी जाहीर केले. नगरपालिका निवडणूक प्रचारात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी परस्परांना अप्रत्यक्ष इशारे दिले होते. हा वाद आणखी वाढू नये या दृष्टीने दिल्ली पातळीवर प्रयत्न झाले आहेत. शिवसेनेबरोबर वादास कारणीभूत ठरलेले भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना गृहमंत्री अमित शहा यांनी बुधवारी मध्यरात्री चर्चेसाठी नवी दिल्लीत बोलावून घेतले. राज्यातील आगामी महापालिका निवडणुका आणि राजकीय परिस्थितीबाबत ही भेट झाल्याचे भाजपने जाहीर केले. शहांच्या भेटीनंतर चव्हाणांचा सूर एकदमच बदलला. नवी दिल्लीहून नागपूरमध्ये परतल्यावर गुरुवारी चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार गुरुवारी रात्री शिंदे व चव्हाण यांच्यात सुमारे दोन तास चर्चा झाली. यानंतर शुक्रवारी सकाळी पत्रकार परिषदेत चव्हाण यांनी आगामी महापालिका निवडणुकीत मुंबई व अन्यत्र महायुती म्हणून लढणार असल्याचे जाहीर केले. तत्पूर्वी चव्हाण यांनी शिंदे यांची भेट घेऊन भाजप महायुतीसाठी सकारात्मक असल्याचे सांगून वातावरण निर्मितीचा प्रयत्न केला असल्याचे सूत्रांनी सांगितले.

कल्याण-डोंबिवली, उल्हासनगरमध्ये रवींद्र चव्हाण यांनी शिवसेनेच्या काही स्थानिक नेत्यांना भाजपमध्ये प्रवेश दिल्याने वाद निर्माण झाला. या वादातूनच शिवसेनेच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार घातला होता. बहिष्कारानंतर अमित शहा यांनी लगेचच दुसऱ्या दिवशी एकनाथ शिंदे यांना भेटीसाठी वेळ दिल्याचे लक्षणीय मानले जाते. या भेटीत शिंदे यांनी फडणवीस व चव्हाणांच्या विरोधात तक्रार केली होती.

तेव्हापासून दोन्ही पक्षांतील संबंध कमालाची ताणले गेले होते. स्वत: शिंदे यांनी मुख्यमंत्र्यांकडील बैठकींना अनुपस्थित राहून नाराजी उघड केली होती.

### भाजपची माघार का ?

शिंदे हे राज्य सरकारमध्ये सहभागी असून केंद्र सरकारलाही शिवसेना खासदारांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर सत्ता मिळाल्यावर भाजपकडून सहकारी पक्षांचे खच्चीकरण होते, असा संदेश जनतेमध्ये जाणे योग्य नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीने लढवाव्यात, अशी भूमिका घेऊन भाजपने युतीसाठी प्रयत्न केले व जागावाटपाची चर्चा केली, असे चित्र उभे करण्याच्या सूचना भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून देण्यात आल्या आहेत.

### शिंदेंचे महत्त्व अबाधित

- राज्यात भाजप आणि शिवसेना शिंदे गटातील संबंध ताणले गेले तरी नवी दिल्लीतील भाजप नेत्यांकडून शिंदे यांचे महत्त्व अबाधित असल्याचे चित्र आहे.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी रात्री त्यांच्या निवासस्थानी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) खासदारांसाठी स्नेहभोजन आयोजित केले होते.
- मोदी यांच्या मेजावर माजी पंतप्रधान देवेगौडा, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्यासह खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना स्थान देण्यात आले. शिंदे यांच्यासाठी हा गौरव मानला जात आहे.

## थोडक्यात...

### सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मार्ग मोकळा

**नागपूर (समर्थ गांवकरी) : मुंबईतील गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासातील अडथळे दूर करण्यासाठी शासकीय कब्जेहक्काच्या भोगवटादार वर्ग 2 च्या जमिनी वर्ग 1 करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहेत. ही सवलत योजना 31 डिसेंबर 2025 पर्यंत होती, ती आता एक वर्षाने वाढवून 31 डिसेंबर 2026 पर्यंत करण्यात आली आहे. खासगी संस्थांना रेडीरेकनरच्या 10 टक्के तर स्वयं पुनर्विकासासाठी 5 टक्के निधी भरावा लागणार आहे. मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या महसूल विभागाने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले असून मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत त्याची घोषणा केली. मुंबईतील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारती मोडकळीस आल्या असून, त्यांना स्वयंपुनर्विकासासाठी प्रोत्साहन देणारा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान आवास योजनेसाठी वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकाच्या 25 टक्के चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) उपलब्ध करून देण्याच्या अटीमुळे सोसायट्यांना योजनेचा लाभ घेता येत नव्हता.**

# आमदार डॉ. किरण लहामटे आक्रमक; शेतकरी, आदिवासी तरुण, शिक्षक व सेविका यांच्या प्रश्नांवर बोट

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**




विधानभवन, नागपूर येथे सुरू असलेल्या अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी (वेळ : रात्री ११.५१) अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरणजी लहामटे यांनी २९३ च्या प्रस्तावावर बोलताना राज्यातील विविध ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर भूमिका मांडत सरकारचे लक्ष वेधले. राज्यात सर्वत्र अतिवृष्टीसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अशा कठीण परिस्थितीत सरकारने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मदत केली, ही बाब स्वागतार्ह असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, केवळ पिकापुरती मर्यादा न ठेवता भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांनाही नुकसान भरपाई मिळावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या कर्जमाफीची घोषणा सरकारने केली असून, त्याचा लाभ तातडीने व पारदर्शक पद्धतीने मिळावा, असेही आमदार लहामटे यांनी स्पष्ट केले. तसेच शेतमालाला योग्य दर मिळावा यासाठी सुरू करण्यात आलेल्या सोयाबीन व कापूस खरेदी केंद्रांचा उल्लेख करत, अतिवृष्टीमुळे ऊसाच्या टनेजमध्ये होणाऱ्या घटीनुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही अनुदान देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी मांडली.

आदिवासी भागातील युवकांसाठी महत्त्वाच्या असलेल्या १७ संवर्ग पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करून संबंधित कर्मचाऱ्यांना कायम करण्यात यावे, अशी ठोस मागणी त्यांनी सभागृहात केली. तसेच आदिवासी समाजाला मिळालेले आरक्षण हे संविधानिक असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला अधिकार आहे. त्या आरक्षणात इतर कोणत्याही जातीचा समावेश होऊ नये, ही सरकारची जबाबदारी आहे, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. यावेळी शिक्षकांच्या सुरू असलेल्या आंदोलनाकडेही लक्ष वेधत, अनेक वर्षांपासून अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य करू नये. मात्र, नवीन भरती होणाऱ्या शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा बंधनकारक करण्यात यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

तसेच उमेद अभियानाअंतर्गत कार्यरत असलेल्या सी.आर.पी., अंगणवाडी सेविका, आशा सेविका आदींचे मानधन वेळेत मिळावे व त्यांच्या वेतनात वाढ करण्यात यावी, अशी मागणीही आमदार डॉ. किरणजी लहामटे यांनी विधानभवनात ठामपणे मांडली.

एकूणच शेतकरी, आदिवासी समाज, शिक्षक व सेविका यांच्या विविध प्रश्नांवर आमदार डॉ. किरणजी लहामटे यांनी सविस्तर आणि प्रभावीपणे आवाज उठवत सरकारकडून सकारात्मक निर्णयांची अपेक्षा व्यक्त केली.

# कारखान्यांना १५ टक्के व्याजासह थकीत एफआरपी देण्याचे आदेश

- साखर कारखान्यांना आयुक्तांचा दणका

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील गाळप हंगामाने गती घेतली आहे. गुरुवारअखेर १८४ कारखान्यांनी सुमारे २७ लाख टन साखर उत्पादन झाले आहे. पण, चार कारखान्यांनी साखर आयुक्तांकडून गाळप परवाना न घेताच हंगाम सुरू केल्याचे निर्दशनास आले आहे, या कारखान्यांना प्रति टन ५०० रुपयांचा दंड केला जाईल, अशी माहिती साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी दिली. राज्यातील अन्य जिल्ह्यांत ऊस गाळप सुरळीत सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यात पहिली उचल न जाहीर करणे. एफआरपीची रक्कम १४ दिवसांत न देणे. अवसायानची कारवाई होऊन ही कारखाना सुरू करण्याच्या घटना समोर आल्या आहेत. पुण्यातील कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखाना, सोलापुरातील सिद्धेश्वर साखर कारखाना, सहकार शिरोमणी वसंतराव काळे आणि गोकुळ शुगर इंडस्ट्रीज लिमिटेड या चार कारखान्यांनी गाळप परवाना न घेताच गाळप हंगाम सुरू केल्याचे समोर आले आहे. या कारखान्यांची १७ डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे. सुनावणीत दोषी आढळून येणाऱ्या कारखान्यांवर गाळप केलेल्या उसावर प्रति टन ५०० रुपये दंडाची कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती साखर आयुक्तांनी दिली. सोलापूर जिल्ह्यातील गोकुळ शुगर इंडस्ट्रीज लिमिटेड या कारखान्यावर दोन वेळा अवसायनाची (RRC) कारवाई झाली आहे. तरीही यंदा कारखाना सुरू करण्यात आला आहे. या कारखान्याने गाळप परवानाही घेतलेला नाही. या बाबत शेतकरी नेते प्रभाकर देशमुख यांनी आंदोलन केले होते. त्याची दखल घेऊन साखर आयुक्तांनी गोकुळसह मातोश्री शुगर्स, जयहिंद शुगर्स, श्री संत दामाजी कारखाना, सिद्धनाथ शुगर्स, धाराशिव शुगर्स, भीमा सहकारी कारखाना, भैरवनाथ शुगर आलेगाव आणि भैरवनाथ शुगर, लवंगी या दहा कारखान्यांना थकीत एफआरपीची (FRP) रक्कम १५ टक्के व्याजासह देण्याचे आदेश दिले आहे.

# घरातील गोष्टी बाहेर आणून एकतर्फी प्रतिमा खराब

## डॉ. अतुल आरोटे यांच्यावर पत्नीला मारहाण केल्याचा गंभीर आरोप; आरोटे परिवाराची मोठी प्रतिक्रिया!


- “एकतर्फी बदनामी” – कौटुंबिक हिंसाचाराच्या आरोपांवर आरोटे परिवाराची प्रतिक्रिया!

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर शहर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या तक्रारीनंतर स्थानिक वैद्यकीय क्षेत्रात मान्यता प्राप्त डॉ. अतुल आरोटे आणि त्यांचे वडील सेवानिवृत्त उपअभियंता रामनाथ (आर. डी.) आरोटे यांच्यावर कौटुंबिक हिंसाचाराचा गंभीर आरोप झाल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. डॉ. अतुल आरोटे यांच्या पत्नी डॉ. स्वप्नाली आरोटे यांनी दाखल केलेल्या तक्रारीत मारहाण, दमदाटी, शिवीगाळ तसेच मुलांना डांबून ठेवल्याचे आरोप नमूद आहेत. याबाबत आरोटे परिवारानेही सविस्तर प्रतिक्रिया देत आरोप फेटाळले असून हा एकतर्फी आणि प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न असल्याचे मत व्यक्त केले आहे.

पत्नीची पोलीस तक्रार; मारहाण व मुलांबाबत गंभीर आरोप!

डॉ. स्वप्नाली यांनी केलेल्या तक्रारीनुसार, डॉ. अतुल आरोटे यांनी मारहाण केली, सासरे रामनाथ आरोटे उपस्थित होते, मुलांना डांबून ठेवण्यात आले, दीर्घकाळ कौटुंबिक त्रास दिला गेला, असे म्हणत त्यांनी शहर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार सादर केली. तक्रार दाखल झाल्याची माहिती प्रसारमाध्यमांत झळकताच प्रकरण चर्चेचा विषय ठरले.




आर. डी. आरोटे यांची भूमिका : “घरातील गोष्टी बाहेर आणून एकतर्फी प्रतिमा खराब” वडील आर. डी. आरोटे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले— “आमचा परिवार वारकरी संप्रदायाशी निगडीत असून पिढ्यानपिढ्या सामाजिक कार्यात आघाडीवर आहे. परंतु, दोन दिवसांपूर्वी आम्हांवर आरोप असलेली तक्रार देण्यात आली आणि माध्यमांत त्याची एकतर्फी प्रसिद्धी झाली. कौटुंबिक बाबी जनतेसमोर उघडपणे मांडण्याचा प्रयत्न झाला.

आमच्या कुटुंबाने केलेले सामाजिक व सार्वजनिक योगदान लक्षात घेतले असते तर असा एकतर्फी निर्णय झाला नसता. योग्य वेळी आम्ही विधीतज्ज्ञ नोटीस देऊन आमची भूमिका स्पष्ट करू.”

त्यांच्या वक्तव्यावरून परिवाराच्या नाराजीची स्पष्ट झलक दिसली.

डॉ. अतुल आरोटे यांचे वक्तव्य : “उपचार न घेता पत्नी बेछूट आरोप करत आहे; मी बदनाम होतोय”

डॉ. अतुल आरोटे यांनी घटनाक्रम उलगडताना सांगितले—“संसार हा दोन चाकांवर चालतो. आम्ही दोघेही डॉक्टर आहोत. पत्नीचे अनेक वर्षांपासून नामांकित रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पण उपचार न घेणे, कुटुंबातील वडीलधाऱ्यांचा अपमान करणे, अहंकाराने इतरांना तुच्छ लेखणे, यामुळे परिस्थिती बिकट होत गेली.”

ते पुढे म्हणाले, “कोरोना काळात आम्ही प्राणाची पर्वा न करता सेवा केली. अनेक रुग्णांकडे पैसे नसतानाही आम्ही सहकार्य केले. त्यामुळे आमची ओळख जनसेवक डॉक्टर म्हणून निर्माण झालेली आहे. परंतु आता माझी प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न सुरू आहे.”

घटनांमधील सर्वात संवेदनशील मुद्दा म्हणजे मुलांची स्थिती.

डॉ. अतुल म्हणाले, “पत्नी सहा महिन्यांपासून आईवडिलांकडे राहते. एके दिवशी मुलांना शाळेतून न सांगता घेऊन गेली. मुलं सुरक्षित आहेत का, याची चौकशी करण्यासाठी आम्ही दोघे – मी आणि वडील – तिच्या घरी गेलो. पण तिने दार आतून लावून घेतले आणि आम्हाला शिवीगाळ केली. आम्ही तिथून परतलो. काही वेळातच आमच्यावर मारहाण केल्याची तक्रार दाखल केली गेली.”

ते म्हणाले, “बदनामी करून काय साध्य होणार? परमेश्वर सर्व बघत असतो. आजपर्यंत आम्ही शांत राहिलो; पण आता कायदेशीररित्या बाजू मांडावी लागेल.”

कौटुंबिक वाद तीव्र; पोलिसांकडून पुढील तपास सुरू: सध्या ही तक्रार तपासाधीन असून पोलिसांनी दोन्ही बाजूंचे निवेदन घेतले आहे.

तक्रारदार पत्नीचे आरोप, आरोटे परिवाराची प्रतिकारक भूमिका, मुलांबाबतची परिस्थिती, वादातील पूर्वइतिहास, या सर्व बाबी लक्षात घेऊन पुढील तपास सुरू आहे.

संगमनेर परिसरात या घटनेने मोठी चर्चा रंगली असून दोन वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिष्ठित नावांमध्ये उद्भवलेल्या वादाकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. पोलिस तपासानंतर पुढील सत्य परिस्थिती स्पष्ट होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



# जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती उपक्रम

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील परिचर्या महाविद्यालयात जागतिक एड्स दिन (१ डिसेंबर) निमित्त विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. एड्सविषयी समाजातील पूर्वग्रह, कलंक आणि भेदभाव दूर करून लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या दिनाचा मुख्य उद्देश असून एचआयव्ही विषाणूमुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व किरकोळ संसर्गही घातक ठरू शकतो, याबाबत विद्यार्थ्यांनी प्रभावी जनजागृती केली.



यावर्षीच्या गेल्या काळातील अडचणींवर मात करणे आणि एड्सविरोधातील प्रतिसादात बदल घडविणे या घोषवाक्यानुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने रॅलीचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी हातात होर्डिंग घेत घोषणाबाजी करून नागरिकांमध्ये एड्सविषयी जागरूकता निर्माण केली. वांबोरी येथे विद्यार्थ्यांनी नाटिकेद्वारे एड्सचा प्रसार, लक्षणे, निदान पद्धती, उपचार व प्रतिबंधात्मक उपाय यावर प्रकाश टाकत प्रभावीपणे जनजागृती केली.

डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलच्या एआरटी सेंटरच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी रुग्ण व नातेवाईकांमध्ये माहितीपर संवाद साधत एड्सविषयी मार्गदर्शन केले. आठवडाभर रुग्णालय परिसरात एड्स प्रतिबंधक छायाचित्र प्रदर्शन, आरोग्यसेवा कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी अतिथी व्याख्यान, तसेच सुरक्षित रक्त संक्रमण पद्धतीवर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. न. ये. बी. च. विभागाच्या सहकार्याने नर्सिंग स्टाफसाठी कर्मचारी विकास कार्यक्रमाचाही समावेश होता.

या कार्यक्रमांचे आयोजन संस्थेचे संचालक डॉ. अभिजीत दिवटे, प्राध्यापक डॉ. रामचंद्र पडळकर व मुख्य प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्राचार्या डॉ. प्रतिभा चांदेकर यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण एड्स जागृती सप्ताह राबवण्यात आला.

उपप्राचार्य व विभाग प्रमुख डॉ. योगिता औताडे, तसेच विभाग प्रमुख श्री. अमोल टेमकर, श्री. अमित कड्डू, सौ. कविता भोकनल, सौ. सलोमी तेलधुणे आणि सहकारी श्री. राहुल कड्डू, श्री. अमोल अनाप, श्री. विशाल पुलाटे, श्री. प्रशांत अमरीत, सौ. संपदा म्हस्के, सौ. प्रीती कड्डू यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला.

एड्स जागृती सप्ताह विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा झाला असून विद्यार्थ्यांच्या सहभागाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

# हिंगणा रायपूरमध्ये दोन एकरपेक्षा जास्त अतिक्रमीत बाजारपेठ!

- आमदार समीर मेघेंची विधानभवनात जोरदार मागणी
- BOT/PPP पद्धतीने 'दुकान गाळे संकुल' उभारण्याची मागणी स्वीकारणार?

**हिंगणा : (समर्थ गांवकरी)**

हिंगणा मतदार संघातील मौजा ग्राम पंचायत रायपूर येथे सुमारे दोन एकरपेक्षा अधिक ग्रामविकास विभागाची जागा अतिक्रमीत बाजारपेठ म्हणून वापरली जात असल्याचे गंभीर प्रकरण आज नागपूर विधानभवनात प्रतिध्वनीत झाले.



या जागेवरील व्यवसायिकांना नियोजनबद्ध व्यवस्था देण्यासाठी BOT अथवा PPP तत्वावर 'दुकान गाळे संकुल' उभारण्याचा प्रस्ताव शासनाने तातडीने विचारात घ्यावा, अशी ठोस मागणी आमदार समीर मेघे यांनी सभागृहात मांडली. या मुद्द्यावर मा. ग्रामविकास मंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच या प्रस्तावावर निश्चितपणे सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन विधान भवनात नोंदवले.

या निर्णयामुळे हिंगणा परिसरातील अनियंत्रित बाजारपेठेला शिस्तबद्ध व आधुनिक संरचना मिळण्याची शक्यता आहे.

हिंगणा मधील रायपूर बाजार पेठेचे रूपांतर हा महत्त्वाचा विकास प्रकल्प ठरणार असल्याने स्थानिक व्यवसायिक व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

# महादजी शिंदे विद्यालयात क्रीडा महोत्सव उत्साहात

- खेळामुळे मन, मेंदू आणि मनगट विकसित होते – प्राचार्य दिलीप भुजबळ

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. विविध खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी क्रीडांगणावर आपले कौशल्य सादर केले.



महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ म्हणाले की, "खेळामुळे मन, मेंदू आणि मनगट यांचा सर्वांगीण विकास होतो. शालेय स्तरावर क्रीडा स्पर्धा झाल्याने प्रत्येक विद्यार्थ्याला सहभागाची संधी मिळते व त्यांच्यात स्पर्धात्मकता तसेच खेळाविषयी आवड निर्माण होते."

क्रीडा महोत्सवांतर्गत हॉलीबॉल, कबड्डी, चमचा-लिंबू, रस्सीखेच, स्लो सायकलिंग, संगीतखुर्ची अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये तब्बल 600 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत उत्कृष्ट प्राविण्य दाखवले. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

क्रीडा महोत्सवाचे नियोजन व मार्गदर्शन क्रीडा विभागप्रमुख सचिन झगडे, संदीप बिरंगळ, प्रदीप मोरे, ज्योत्स्ना लोखंडे, सुवर्णा शेलार, विजया शेलार आणि राजेश पोटे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर साबळे यांनी केले. प्रास्ताविक बापू जाधव तर आभारप्रदर्शन धनंजय देशमुख यांनी केले.

# कावेरीबाई जयप्रकाश पत्रे यांचे निधन

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**



नांदेड शहरातील शामनगर येथील ज्येष्ठ महिला नागरीक कावेरीबाई जयप्रकाश पत्रे (वय ६६ वर्षे) यांचे दि.१० बुधवारी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर दि.११ गुरुवारी रोजी ४ वा. अर्धापूर येथील जंगम समाज समशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कावेरीबाई जयप्रकाश पत्रे यांच्या पश्चात पती, दोन मुले,दोन मुली,सुना, नातवंडे असा परिवार आहे. इंडस बँकेचे शाखा अधिकारी संदीप जयप्रकाश पत्रे, सुहास जयप्रकाश पत्रे यांच्या आई होत.

# अवजड वाहतूक तात्पुरत्या स्वरुपात बंद करा : देवेंद्र लांबे

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

नगर शिर्डी महामार्गावरील अवजड वाहतूक तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात यावी अशी मागणी नगर मनमाड रस्ता दुरुस्ती कृती समितीचे सदस्य देवेंद्र लांबे पा. यांनी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



देवेंद्र लांबे यांनी म्हंटले आहे कि, अहिल्यानगर ( विळद घाट) ते शिर्डी ( सावळीविहीर) महामार्गचे (NH-160) काम चालू असल्यामुळे एकेरी वाहतूक सुरु आहे. एकेरी वाहतुकीमुळे रहदारीस मोठ्याप्रमाणावर अडथळा निर्माण होत आहे.

डिसेंबर महिन्यात नाताळ सणाच्या सुट्यानंमुळे शिर्डी व शिंगणापूर येथे दर्शना साठी देश विदेशातून भाविक येत असतात. येणाऱ्या भाविकांच्या गर्दीमुळे एकेरी वाहतुकीमुळे मोठी वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे. त्याच बरोबर याच (NH-160) महामार्गांवर अवजड वाहतूक सुरु ठेवल्यास मोठ्या प्रमाणावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकेरी वाहतुकीमुळे आत्तापर्यंत शेकडो प्रवाशांचे प्राण अपघातात गेलेले आहे. मागील काही दिवसांमध्ये देखील एकेरी वाहतुकीमुळे रस्ता अपघातात अनेक प्रवासी मृत्युमुखी पडलेत तर काहींना गंभीर स्वरूपाचे दुखापत झालेली आहे.

नगर- शिर्डी रस्ता जोपर्यंत दुहेरी वाहतुकीस चालू होत नाही,तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात अवजड वाहनांचा मार्ग बदलून नगर शिर्डी महामार्गांवर अवजड वाहतुक बंद करावी.

दिलेल्या पत्राची नोंद न घेतल्यास नगर ते शिर्डी या महामार्गांवर(NH-160) अवजड वाहणांमुळे कोणतीही जीवित हानी झाल्यास की कोणत्याही प्रवशाला कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास संबंधित प्रशासनाला जबाबदार धरून कायदेशीर कारवाई करून अपघात ग्रस्त प्रवाशांना न्याय मिळवून देणे कामी सहकार्य करावे अशी मागणी श्री.लाबे पा.यांनी केली आहे.

नगर शिर्डी महामार्गावर दीड महिन्यांपूर्वी राहुरी परिसरातील खड्डे बुजविण्यासाठी नागरिकांकडून आंदोलन करण्यात आले होते. आंदोलनानंतर खड्डे बुजविणे अपेक्षित होते परंतु राहुरी खुर्द ते राहुरी परिसरात एका बाजूने मोकळी खडी टाकल्यामुळे मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य राहुरी परिसरात निर्माण झाले आहे.या धुळीमुळे नागरिकांना व लहान मुलांना श्वसनाचे आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# रुतिक सुनील गजर यांची क्रिकेटर म्हणून निवड

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील रुतिक सुनील गजर यांची 'इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग' (ISPL) हैदराबाद संघात क्रिकेटर म्हणून निवड झाली असून त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



रुतिक यांचे प्राथमिक शिक्षण (इयत्ता 1 ते 4) जिल्हा परिषद शाळा, जोशी वस्ती येथे झाले. त्यानंतर इयत्ता 5 ते 10 पर्यंतचे शिक्षण इंदिरा गांधी विद्यानिकेतन, श्रीगोंदा फॅक्टरी येथे पूर्ण केले. उच्च माध्यमिक ते पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी छत्रपती शिवाजी महाविद्यालय तसेच महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा येथे घेतले.

लहानपणापासूनच क्रिकेटची आवड जोपासणाऱ्या रुतिक यांना खेळाची प्रेरणा त्यांच्या वडिलांकडूनच मिळाली. त्यांचे वडील सुनील रावसाहेब गजर हे देखील क्रिकेट खेळायचे. जोशी समाजाच्या भटकंतीच्या पार्श्वभूमीवरही मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी मोठे कष्ट घेतले. "आपण ज्या अडचणींना सामोरे गेलो, त्या आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नयेत" या भावनेतून वडिलांनी केलेले प्रयत्न आज फलद्रूप झाल्याचे पाहायला मिळत आहे.

रुतिक यांच्या क्रिकेट विकासात अनेकांचे मार्गदर्शन लाभले. त्यामध्ये संतोष नागवडे, अशोक काळाणे, तेजस जाधव, शिवाजी पोटे, तुषार वंजारे, ऋषिकेश जोहरी (पुणे), मधुकर काळाणे आणि अभिजित राऊत (पुणे) यांचा समावेश आहे.

त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात गावातील संतोष शेठ नागवडे इलेव्हन संघातून झाली. त्यानंतर श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना संघ, तसेच पुढे पुण्यात हमराज मृत्युंजय ग्रुपसोबत व्यावसायिक क्रिकेटचा प्रवास सुरू झाला. डावखुरा फलंदाज (Left-hand Batsman) म्हणून त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्यांची ISPL हैदराबाद संघात निवड झाली.

या यशाचे श्रेय रुतिक यांनी आपल्या आई-वडिलांना दिले असून, कठीण परिस्थितीतही कुटुंबाकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. मिळालेल्या संधीचे सोने करून स्वतःची प्रतिभा सिद्ध करण्याचा निर्धार त्यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

# शेतकऱ्याची होते आर्थिक लूट

**तामसा: (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्ह्यात सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या तामसा भुसार व्यापाऱ्याकडून शेतकऱ्यांची आर्थिक लूट. नांदेड जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या तामशात कृषी उत्पन्न बाजार समिती ठरविलेल्या दराप्रमाणे शेतकऱ्यांचा हमीभावात कट्टी हमाली चे दर जास्त आकारण्यात येत असण्याची तक्रार आल्यानं कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शाखाप्रमुख व व्यापाऱ्यांची हितसंबंध काय. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला पाहिजे तसा उतारा न आल्यानं शेतकरी हवाला दिली झालेला आहे वरून आलेल्या शेतीमालाला कृषी उत्पन्न बाजार समितीने ठरविलेल्या दरापेक्षाआडत दर जास्त आकारण्यात येत आहे.

# अक्कलकोट दर्शन यात्रेला उत्साहपूर्ण प्रतिसाद

- स्वाती देशमुख यांच्या पुढाकाराने बससेवा सुरू

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी वाढत असलेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेऊन बेलवंडी बुद्रुक येथून प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेनंतर एसटी महामंडळाच्या बसद्वारे एकदिवसीय दर्शनयात्रेची नवी सेवा सुरू करण्यात आली आहे.



यापूर्वी बेलवंडीतील महिलांना श्रीगोंद्यातून सुटणाऱ्या बसचा वापर करावा लागत होता. मात्र बेलवंडीची मोठी लोकसंख्या आणि परिसरातील लोणी व्यंकनाथ, पारगाव, येळपणे, पिसोरे, बोरी, बाबुर्डी, पिंपळगाव पिसा, खरातवाडी, एरंडोली, चिंभळे या भागातील स्वामी समर्थ भक्तांची लक्षणीय संख्या पाहता ही स्वतंत्र सेवा सुरू करण्यात आली.

स्थानिक स्वामी समर्थ केंद्रांमुळे या क्षेत्रात भक्तांची मोठी संख्या असून, विशेषतः महिलांसाठी ही सेवा उपयुक्त ठरणार आहे. या यात्रेत अधिकाधिक महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या व स्वामी समर्थ सेवेकरी सौ. स्वाती देशमुख यांनी केले. या उपक्रमासाठी सौ. प्रतिभा गांधी आणि सौ. मनीषा कडुस यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

आजवर ऑक्टोबर व डिसेंबर महिन्यात झालेल्या दोन यात्रांना महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत समाधान व्यक्त केले आहे. एसटीच्या तुलनेने कमी भाड्याचा आणि सुरक्षित प्रवासाचा लाभही महिलांना मिळत असल्याने त्यांनी आयोजकांचे आभार मानले आहेत.

यात्रेसाठी अधिक माहितीसाठी सौ. स्वाती देशमुख यांच्याशी 9850558122 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# छाया शेळके यांनी ऊस उत्पादन घेऊन एक नवा उंचाक नोंदवला

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना, बोरी येथील ऊस उत्पादक सभासद सौ. छाया सचिन शेळके यांनी चालू गळीत हंगामात प्रति एकरी तब्बल 120 मेट्रिक टन ऊस उत्पादन घेऊन नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे यांनी त्यांचा विशेष गौरव केला. बोरी येथील प्रगतशील शेतकरी भगवान शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन शेळके आणि सौ. छाया शेळके यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब केला. योग्य खत व्यवस्थापन, पाणी नियोजन, तसेच औषधांची अचूक फवारणी या घटकांचा समतोल साधत त्यांनी 86032 या ऊस जातीचे उच्च प्रतीचे उत्पादन घेतले आहे.

सौ. शेळके यांनी अडीच एकर क्षेत्रातून तब्बल 300 मेट्रिक टन ऊस उत्पादित करून तो नागवडे कारखान्याकडे गळीतासाठी दिला आहे. मागील 2024-25 हंगामात त्यांनी प्रति एकर 110 मे. टन ऊस उत्पादन घेतले होते. चालू हंगामात त्यांच्या उत्पादनात 10 मे. टन प्रति एकर वाढ झाल्याचेही उल्लेखनीय आहे.

# ३३ कुंटुबानी एकत्र येत केला सामुदायीक जागरण गोंधळ कार्यक्रम

- अभूतपूर्व गर्दीने रमला जखणगाव मधील सामुदायिक जागरण गोंधळ.
- मारुती महादेव मंदिर देवस्थान ट्रस्ट जखणगावचा पुढाकार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

आरोग्यदायी गाव म्हणून राज्यातच नव्हे तर देशात सुप्रसिद्ध असणाऱ्या आरोग्य ग्राम जखणगाव मध्ये सामुदायिक जागरण गोंधळाचा आगळावेगळा कार्यक्रम नुकताच पार पडला.महाराष्ट्रात प्रसिद्ध असणाऱ्या कोमल ताई करण पाटोळे मेंढापूरकर जागरण गोंधळ पार्टीचा विशेष कार्यक्रम गावकऱ्यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रमात गावातील



एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल ३३ परिवारांनी या सामुदायिक जागरण गोंधळात सहभाग घेतला होता.

जखणगावच्या भूमीत खंडेश्वराचं पावन मंदिर आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य असं आहे की इथून मानाची काठी जेजुरीला पोहोचल्याशिवाय जेजुरीचे यात्रा सुरू होत नव्हती. गावातील गायकवाड परिवार, कर्डीले परिवार,मोरे परिवार व परिसरातील वाघमारे परिवार यांना या दैवताच्या पुजाऱ्याचा मान आहे. गावातील कर्डीले परिवाराला तर प्रत्येक घरी स्वतःचे देवघर नाही. या परिवारातील प्रत्येक कुटुंबाचे घट स्थापना ही सुद्धा खंडोबा मंदिरातच होते. एवढेच नव्हे तर कोणत्याही कुटुंबाने व्यक्तिगत जागरण गोंधळ घातल्यास त्यांनाही तो खंडोबा मंदिरासमोरच घालावा लागतो.याच पार्श्वभूमीवर गावातील लोकनियुक्त सरपंच डॉ. सुनील गंधे यांच्या संकल्पनेतून, दक्षिणाभिमुखी हनुमान व हटकेश्वर महादेव यांच्या मंदिराच्या देखभालीसाठी मारुती महादेव मंदिर ट्रस्ट स्थापन करण्यात आला असून त्या मार्फत या आगळ्यावेगळ्या सामुदायिक जागरण गोंधळाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या जागरण गोंधळाच्या कार्यक्रमाच्या व्यासपीठाची पूजन जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दादासाहेब गुंजाळ साहेब यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आले. तर गोंधळाच्या कार्यक्रमाचा भंडारा खंडेश्वर देवस्थानच्या पुजाऱ्यांच्या हस्ते उधळून कार्यक्रम सुरू करण्यात आला.सर्वप्रथम सहभागी झालेल्या सर्व जोडप्यांनाच नव्हे तर संपूर्ण परिवारालाच संयोजकाच्या वतीने पाची पोशाखाचा आहेर करण्यात आला. व हाच पोशाख घालूनच पूजेला सुरुवात झाली. वाघ्या व मुऱ्हळी यांनी पारंपारिक पद्धतीने देवांना आमंत्रण देऊन, घट उजळून,खंडोबा,अंबाबाई व सिद्धनाथ यांची घटस्थापना करून विधिवत सर्व देवांची पूजा केली. तद नंतर महाआरती करण्यात आली. उपस्थित सर्वांना मिस्टान्न भोजनाचा महाप्रसाद वाटण्यात आला. रात्री बरोबर नऊ वाजता जागरण गोंधळाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली.भव्य व्यासपीठ,पारंपारिक पिवळ्या रंगाची झालर, प्रदीर्घ मोठा सभामंडप, उत्तम बैठक व्यवस्था त्यामुळे जखनगावच नव्हे तर पूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून आलेल्या हजारो भावीक भक्तांनी या कार्यक्रमाचा आनंद लुटला. कोमलताई च्या पहाडी आवाजाने व भक्तीगीताच्या संवाद्य मैफिलीने सर्व भक्त मंत्र मुक्त झाले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे पुरुषांपेक्षा महिलांची अलोट गर्दी उसळली होती. नगर पारनेर तालुक्यातील वेगवेगळ्या गावातून महिला खाजगी वाहन करून आल्या होत्या.थंडीची लाट असून सुद्धा व बिबट्याचे भीतीदायक वातावरण असतानाही लोकांनी या कार्यक्रमाला अलोट गर्दी केली होती.

# मुख्यमंत्री फडणवीस, विजय दर्डा व डॉ. आरोटे यांची भेट!






**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

दैनिक लोकमत नागपूरच्या वर्धापन दिनानिमित्ताने राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, माजी खासदार तथा लोकमतचे मालक विजय बापू दर्डा, मा, सत्यजित दादा तांबे आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांची विशेष सदिच्छा भेट झाली. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य प्रसिद्धीप्रमुख भाऊसाहेब वाकचौरे व दैनिक समर्थ गांवकरी महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर उपस्थित होते.

या भेटीदरम्यान पत्रकारिता क्षेत्रातील वर्तमान घडामोडी, डिजिटल माध्यमांची वाढती ताकद, ग्रामीण पत्रकारितेची आव्हाने, आणि जबाबदार पत्रकारितेची गरज यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर तिघांमध्ये सखोल व फलदायी चर्चा झाली.

लोकमतच्या वर्धापन दिनानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांनी संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन करत महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये लोकमत समूहाने निभावलेली भूमिका अधोरेखित केली. तर विजय दर्डा यांनी ग्रामीण व शहरी पत्रकारिता जोडणाऱ्या कामातून समाज घडविण्याचे आवाहन केले.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनीही ग्रामीण भागातील पत्रकारांना भेडसावणाऱ्या अडचणी, सत्याधारित बातमीची गरज व समाजाभिमुख पत्रकारितेची दिशा यावर महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले.

## शेतीत जाणाऱ्या पारंपरिक रस्त्याच्या प्रकरणात नायब तहसिलदारकडून अन्याय - दत्तात्रय गावखरे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



मौजे चास (ता.नगर) येथील गट नं.१०६६ या शेतीत जाणाऱ्या पारंपरिक रस्त्याच्या प्रकरणात निवासी नायब तहसिलदार गौरव नवनाथ दळवी यांनी समोरच्या पक्षकारांशी हातमिळवणी करून अन्यायकारक निर्णय दिल्याचा आरोप करत दत्तात्रय गावखरे यांनी आज जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

गावखरे यांच्या शेतात जाण्यासाठी असलेला पारंपरिक रस्ता दत्तात्रय नाना गावखरे, संतोष सुर्यभान गावखरे, अशोक सुर्यभान गावखरे व सुर्यभान शंकर गावखरे यांनी पत्र्याची टपरी व तार कंपाऊंड करून अडविल्याची तक्रार २०२१ मध्ये तहसिलदारांकडे करण्यात आली होती. स्थळनिरीक्षण, पंचनामा व सुनावणी करून तहसिलदारांनी १० जून २०२२ रोजी C-D मार्गाने रस्ता वापरण्याचा निर्णय गावखरे यांच्या बाजूने दिला होता.

या आदेशाविरोधात समोरच्या पक्षकारांनी ७ महिने उशिराने रिव्हीजन दाखल करूनही SDO यांनी निर्णय रद्द करून केस फेरचौकशीसाठी तहसिलदारांकडे पाठवली. सध्या फेरचौकशी सुरू असून नायब तहसीलदारांनी समोरच्या पक्षाला मिळेल असा निर्णय दिल्याची तक्रार गावखरे यांनी निवेदनात केली आहे.

निवेदन देताना शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आनंदराव शेळके, विनोद साळवे सह शिवसैनिक उपस्थित होते.

## कोलंबी उपसा सिंचन प्रकल्प निकृष्ट दर्जाचा!

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील कोलंबी जल उपसा सिंचन प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा गंभीर आरोप करत या प्रकल्पाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून संबंधित गुत्तेदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी अतिरिक्त पर्यायी पाईपलाइन मंजूर करावी, अशी मागणी कांतराव निकलपुरे यांनी जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून निवेदनाद्वारे केली आहे. शेतीला पाणीपुरवठा व्हावा यासाठी मौजे लालवंडी, सुगाव, तलबिड-ताकबीड, कोलंबी, मांजरम, अंचोली, सोमाठाना, नायगाव, नायगाववाडी, गोदमगाव आदी गावांतील शेतकऱ्यांनी वेळोवेळी मागणी केली होती.

## शेतकरी प्रकाश वाळके यांचा सत्कार

- नैसर्गिक पिकवलेली फळे ही आरोग्यासाठी फलदायी आहेत : राजेंद्र पडोळे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



नैसर्गिक पिकवलेली व विना केमिकल असलेली फळे आरोग्यदायी असतात. धकाधकीच्या जीवनात नैसर्गिक पद्धतीने पिकविलेली फळे शहरात मिळत नाहीत. परंतु वाळकी येथील प्रकाश वाळके यांनी संत्री, मोसंबी ,पेरू पपई, चिक्कू आणि केळी यासारखी फळे शेतकरी ते ग्राहक या योजनेअंतर्गत ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे.

यामुळे ग्राहकांना दर्जेदार व उत्कृष्ट गुणवत्ता असलेली फळे खायला मिळत आहेत. याबाबत ग्राहकांनी समाधान व्यक्त केले आहे.असे प्रतिपादन "द टी हाउस" कंपनीचे संचालक राजेंद्र पडोळे यांनी केले आहे.

नैसर्गिक पिकवलेली फळे व भाजीपाला शेतकरी ते ग्राहक या योजनेअंतर्गत नविन टिळक रोड येथील "द टी हाऊस" मार्फत ग्राहकांना कमी दरात उपलब्ध करण्यात आली आहेत.वाळकी येथील शेतकरी प्रकाश वाळके व हिवरेझरे येथील शेतकरी नारायण रोडे यांनी विना केमिकल व नैसर्गिक पिकवलेली फळे ग्राहकांसाठी अत्यल्प पदरात उपलब्ध केली असल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी "द टी हाऊस" चे संचालक राजेंद्र पडोळे, बारा बलुतेदार महासंघाचे अनिल इवळे, इंजिनीयर चंद्रकांत पुंड, इंजिनीयर ओंकारेश्वर झावरे, नारायण रोडे, गणेश कोल्हे आदी उपस्थित होते. या पुढील काळातही विना केमिकल असलेली फळे ग्राहकांसाठी उपलब्ध करून देतील.असे आश्वासन शेतकरी प्रकाश वाळके यांनी दिले आहे.

## अहिल्यानगर अल्पवयीन मुलीचे अपहरण व लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीस २० वर्षे तुरुंगवास व दंडाची शिक्षा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अल्पवयीन मुलीचे अपहरण व लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी वरखेड येथील २३ वर्षीय तरुणास नेवासा विशेष जिल्हा न्यायालयाने २० वर्षे तुरुंगवास व दंडाची शिक्षा सुनावली आहे. दि. १८ ऑक्टोबर २०२१ रोजी अल्पवयीन मुलगी तिच्या आत्याच्या घरी स्वयंपाक करण्यासाठी जात आहे, असे सांगून गेली. ती पुन्हा घरी आली नाही, म्हणून तिचा शोध घेतला. परंतु, ती मिळून आली नाही. देवा उर्फ देविदास शेषराव उर्फ शशिकांत कुंढारे (वय-२३, रा. वरखेड, ता. नेवासा) याने अल्पवयीन पिडीतेस फूस लावून पळवून नेले, अशी गावामध्ये चर्चा पसरली. त्यानुसार आरोपी विरुध्द नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक समाधान भाटेवाल यांच्याकडे देण्यात आला. अल्पवयीन पिडीत मुलीस पळवून नेण्यासाठी आरोपीस त्याच्या वडिलांनी मदत केली. तसेच आरोपी देवा उर्फ देविदास शेषराव उर्फ शशिकांत कुंढारे याने पिडीतेस सावेडी परिसरात नेऊन ती अल्पवयीन आहे, याची माहिती असतानाही तिच्या इच्छेविरुध्द लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केला. पोलिसांनी पिडीता व आरोपीचा शोध घेतला, पिडीतेचा जबाब नोंदवला. तसेच पिडीताचा न्यायालयासमोर जबाब नोंदवण्यात आला. तसेच पिडीताचे वय-१५ वर्षापेक्षा कमी आहे, याबाबत तिचा जन्माचा दाखला हजर करुन त्यावरील साक्षीदारांचा जबाब नोंदवण्यात आला. इतर साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले.

या गुन्ह्याचा पुढील तपास पो. नि. बाजीराव पोवार यांनी करुन दोषारोपत्र न्यायालयात दाखल केले. त्यांचाही जबाब नोंदवण्यात आला. वैद्यकीय अधिकारी तसेच अल्पवयीन पिडीता व फिर्यादी तसेच तपासी अधिकारी यांचे जबाब महत्वाचे ठरले. या खटलमध्ये अति. सरकारी अभियोक्ता देवा काळे व अति. सरकारी अभियोक्ता विष्णुदास भोर्डे यांनी सरकार पक्षाच्या वतीने कामकाज पाहिले. पिडीताचे वय घटनेच्या वेळी १५ वर्षापेक्षा कमी आहे. तसेच तिस लग्नाचे आमिष दाखवून अपहरण केले, ही बाब सरकारी पक्षाने न्यायालयासमोर तोंडी व लेखी पुरावे देवून सिध्द केली. असा युक्तीवाद सरकारी वकील विष्णुदास भोर्डे यांनी केला, तो न्यायालयाने ग्राह्य धरुन आरोपी देवा उर्फ देविदास शेषराव उर्फ शशिकांत कुंढारे यास पोक्सो कलम ६ नुसार २० वर्षे तुरुंगवास व कलम ३६६ नुसार दोन वर्षे सक्तमजूरी व दंडाची शिक्षा नेवासा येथील विशेष जिल्हा न्यायाधीश आर. आर. हस्तेकर यांनी सुनावली. या कामी पैरवी अधिकारी सहाय्यक फौजदार नरेश चौहाण यांनी सहाय्य केले. पो.ना. अशोक कुदळे व पोलीस कॉन्स्टेबल सुमित करंजकर यांनी तपास मदतनीस म्हणून काम पाहिले.

## ग्रामपंचायतींना ४१ कोटींचा निधी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातल्या पात्र ठरलेल्या ४ जिल्हा परिषदा, ४० पंचायत समित्या आणि २१,५५१ ग्राम पंचायतींना पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाचा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अबंधित निधीच्या स्वरूपातील पहिल्या हप्त्याचा केंद्र शासनाकडून मुक्त करण्यात आलेला ७१७.१७ कोटी रूपये इतका निधी वितरीत करण्यात येत आहे. त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील १२१८ ग्रामपंचायतींना ४१ कोटी १४ लाख ५४ हजार २६४ रूपयांच्या निधीचा समावेश आहे. या निधीमुळे गावागावांत विकास कामांना वेग येणार आहे. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत स्तरावरील निधीच्या वितरणाचे नियोजन, सनियंत्रण व समन्वयनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांची राहील.

## लोकसहभागातुन उभारला वनराई बंधारा

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**




नायगाव - तालुक्यातील कोलंबी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत लोकसहभाग, श्रमदान व सामाजिक उत्तरदायित्वच्या माध्यमातून गावालगतच्या ओढ्याजवळ पाणी साठवणूकिसाठी वनराई बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. वनराई बंधारा हा बंधाऱ्याच्या बांधकामाचा एक कच्चा प्रकार आहे. वनराई बंधारा हा एक नैतिक आणि पर्यावरणीय उपाय आहे.

ज्याच्या माध्यमातून पाणी संचयन आणि मृद संधारन साधता येते. यामुळे पाणी प्रश्नाचा सामना करण्यास मदत होते. पाणी वाचवा, पाणी साठवा या संकल्पनेतून गावकऱ्यांकडून उत्स्फूर्तपणे वनराई बंधारा उभारण्यात आला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत कोलंबी येथे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये लोकसहभागातून वनराई बंधारा उभारला हे विशेष.

यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, तलाठी, कृषी सहायक, गावातील सर्व विभागाचे कर्मचारी, नागरिक, महिला - पुरुष यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

## स्व. गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन





**तामसा : (समर्थ गांवकरी)**

माजी केंद्रीय मंत्री व माजी मुख्यमंत्री स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंती निमित्त भाजप संपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आलं. यावेळी भाजप मंडळ तालुका अध्यक्ष भागवत देवसरकर, डॉ. दिपक नाईक, जिल्हा प्रकोष्ठ पदवीधर महेश मठपती, तालुका उपाध्यक्ष शशिकांत बंडावार, शहर अध्यक्ष शिवराज वारकड, ओम इंदेवार, सचिन तांदळे,तालुका अध्यक्ष युवा देवांनंद वानखेडे, तालुका सरचिटणीस स्वप्नील रामगिरवार, अर्जुन जोशी,अविनाश पाटील सह भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

## विविध मागण्यांसंदर्भात आमदार दातेंचा अधिवेशनात बुलंद आवाज

### रस्ते, सौर पंप, बिबट्यांचा वाढता धोका, अतिवृष्टी नुकसानभरपाई, स्थानिक रोजगारावर शासनाचे लक्ष वेधले

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**




सध्या नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी नियम २९३ अंतर्गत बोलताना तालुक्याच्या सर्व तातडीच्या व जनहिताच्या मुद्द्यांवर प्रभावीपणे आवाज उठवला.

सुरवातीला आमदार दाते सरांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अतिवृष्टीग्रस्तांसाठी तातडीने मदत जाहीर केल्याबद्दल अभिनंदन केले. मात्र पारनेर तालुक्यातील पारनेर व कान्हूर पठार ही महसूल मंडळे नुकसानभरपाईपासून वंचित राहिल्याने त्यांच्यातील २५-३० गावांतील शेतकरी अद्यापही मदतीपासून दूर आहेत, अशी गंभीर बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणली. पर्जन्यमापक यंत्र फक्त एकाच गावात असताना त्यावर आधारित निर्णय देणे अन्यायकारक असल्याचेही ते म्हणाले.

त्यानंतर आमदार दाते यांनी सौर शेतीपंप बसविण्यात येत असलेल्या अडचणींबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज करून वर्षभरापासून प्रतीक्षा केली तरी पंप बसवले जात नसल्याचे सांगून, तातडीने कार्यवाही करून सर्व प्रलंबित मागण्या मंजूर कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. सलग क्षेत्राच्या अटीमुळे अनेक शेतकरी पात्र ठरत नसल्याने ही अट रद्द करण्याचेही त्यांनी सुचविले.

पुढे बोलताना बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे मतदारसंघात निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणावरही आमदार दाते यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. पारनेरमध्ये आतापर्यंत सहा जणांचे प्राण गेले असून पाळीव जनावरांचे मोठे नुकसान झाले आहे. "बिबट्या दिसेल तिथे पकडण्याची / मारण्याची परवानगी द्यावी, शेतावर राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरांना व गोठ्यांना संरक्षणात्मक तार कंपाउंड देण्यासाठी शासनाने योजना आणावी," अशी त्यांनी ठाम मागणी केली. याशिवाय मतदारसंघातील सुपा MIDC मध्ये स्थानिकांना रोजगार न देणाऱ्या उद्योजकांवर शासनाने कठोर भूमिका घ्यावी, अशा शब्दांत त्यांनी स्थानिक तरुणांच्या नाराजीची दखल घ्यायला भाग पाडले.

अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे मतदारसंघातील रस्ते, मोरीपूल, बंधारे मोठ्या प्रमाणात वाहून गेल्याने त्यांचे प्रस्ताव शासन पातळीवर प्रलंबित आहेत. हे प्रस्ताव आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मंजूर करून पुढील पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती पूर्ण करावी, अशी विनंतीही त्यांनी सभागृहात केली. तसेच नगर तालुक्यातील केडगाव–सोनेवाडी–अकोळनेर हा केंद्राच्या इंधन वाहतुकीचा महत्त्वाचा मार्ग असूनही रस्त्याची दुरवस्था बिकट आहे. हा रस्ता राज्य सरकारमार्फत दुपदरी व मजबूत करण्याची मागणीही आमदार दाते यांनी यावेळी केली.

अधिवेशनातील ठोस, तथ्याधिष्ठित आणि जनहिताचे प्रश्न मांडत आमदार काशिनाथ दाते सरांनी पारनेर-नगर मतदारसंघातील प्रत्येक घटकाचा आवाज शासनापर्यंत पोहचवल्याने मतदारसंघातील नागरिकांत चैतन्याचे वातावरण पसरल्याचे दिसत आहे.

# दिव्यातील रेशनिंग दुकानातील भ्रष्टाचार उघड; ग्राहकांची लूट

## भाजपच्या सौ. सपना रोशन भगत आक्रमक

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



दिवा शहरातील रेशनिंग दुकानदार सामान्य जनतेची लूट करत असून लाभार्थींना मिळणारा हक्काचा शिधा कमी देत असल्याचे उघड झाले आहे. दिवा शहरातील मुंब्रादेवी कॉलनी, श्लोक नगर भागातील रेशनिंग दुकान क्र. ४८ फ १०८ येथे घडला आहे. सदर प्रकरणी नागरिकांनी दिवा भाजपच्या महिला मोर्च्या अध्यक्षा सौ. सपना रोशन भगत यांच्याकडे तक्रार केली असता त्यांनी सदर दुकानावर जाऊन खरी परिस्थिती जाणून घेतली. सदर शिधावाटप दुकानात ग्राहकांसोबत जाऊन पाहणी केली असता रेशनिंग दुकानदार प्रत्येक व्यक्ती मागे १ किलो राशन कमी देत असल्याचे निदर्शनास आले. शासन नियमानुसार प्रत्येक व्यक्ती मागे २ किलो गहू व ३ किलो तांदूळ असा शिधा मिळणे गरजेचे असताना चक्क एक किलो राशन कमी देत असल्याचे उघडकीस आले तर तक्रार बुक लाभार्थींना दिले जात नसत हा प्रकार उघडकीस आला.

दिवा शहरातील प्रत्येक रेशनिंग दुकानात हा प्रकार सुरू असून ही जनतेची लूट थांबली पाहिजे यासाठी जनतेने ही जाब विचारून आपला पूर्ण शिधा घ्यावा जो दुकानदार देणार नाही. त्याची रीतसर तक्रार रेशनिंग ऑफिस येथे करावी किंवा माझ्याशी संपर्क करावा अन्यथा सदर भ्रष्टाचाराबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सोबत चर्चा करून तात्काळ परवाना रद्द करण्याची मागणी सौ. सपना भगत यांनी केली आहे.



**ठाणे, दिवा ता :** मुंब्रा पोलीस ठाणे अंतर्गत दिवा पोलीस चौकी हद्दीत मा. सहाय्यक पोलीस आयुक्त प्रिया डमाळे कळवा विभाग, ठाणे यांचे उपस्थितीत दिवा शहर परिसरात कोम्बिंग ऑपरेशन आयोजित करण्यात आले होते. सदर कोम्बिंग दरम्यान श्री राजू पाचोरकर, पोलीस निरीक्षक, मुंब्रा पोलीस स्टेशन, 5 पोलीस अधिकारी व 31अंमलदार, RCP व गोपनीय अंमलदार रवि सातपुते हजर होते. कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान एकूण 23 आरोपी चेक केले. सदर कोम्बिंग दरम्यान महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 142 प्रमाणे 01 नुसार कारवाई, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 122 (क) प्रमाणे 01 कारवाई, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 65 ई प्रमाणे 02 कारवाई, कोफ्ता अॅक्ट 1 तसेच 33 W 131 प्रमाणे 1 कारवाई करण्यात आली. तसेच दिवा पोलीस चौकी ते गणेश नगर –गणेश पाडा –दातिवली स्टेशन –दातिवली स्मशानभूमी–श्लोक नगर–दिवा रेल्वे स्टेशन, प्लॅटफॉर्म नंबर 08–रिलायन्स टॉवर–मुंब्रादेवी कॉलनी–दिवा रेल्वे स्टेशन–साबेगाव–भगतवाडी ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दिवा असा रूट मार्च काढण्यात आला.


## थोडक्यात बातम्या...



### श्रीगोंदा कन्या विद्यालयाचे शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत उत्तुंग यश

**श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिपत्याखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा 2025-26 नुकत्याच शैक्षणिक संकुल, सिंधुदुर्ग येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेचे श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा येथील 14 वर्षे वयोगटातील विद्यार्थिनी कु. तेजस्विनी श्रीधर गिरमकर हिने 30 किलो वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदकाची (सिल्वर मेडल) चमक दाखवली. तेजस्विनीच्या या यशामागे क्रीडा विभागप्रमुख श्री. किरण कोकणी, बुद्धभूषण साळवे तसेच इंटरनॅशनल कुस्ती अकॅडमीचे मेजर फंड यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. तिच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. श्री. बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य मा. कुंडलिकराव दरेकर, उत्तर विभागीय अधिकारी मा. श्री. नवनाथ बोडखे, मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे, उपमुख्याध्यापिका सौ. निलीमा कातोरे, पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब शिंदे व गुरुकुलप्रमुख श्री. किरण शिंदे यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तेजस्विनीच्या या राज्यस्तरीय यशाबद्दल सर्वत्र कौतुकाची लाट असून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### शिवराज पाटील यांच्या निधनाने पितृतुल्य मार्गदर्शक हरपला : खा. अशोक चव्हाण



**नांदेड जिल्हा (स. गांवकरी) :** लोकसभेचे माजी अध्यक्ष व माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने पितृतुल्य मार्गदर्शक हरपल्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करताना ते म्हणाले की, देशाचे एक व्यासंगी व कणखर नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. राष्ट्रीय राजकारणात ते महाराष्ट्राचा एक चेहरा होते. त्यांनी आयुष्यभर सार्वजनिक प्रश्नांना अग्रक्रम दिला आणि देशसेवा केली. केंद्रीय गृहमंत्री म्हणून त्यांनी अनेक दूरदर्शी धोरणे अवलंबली. त्या धोरणांचा प्रभाव व सकारात्मक परिणाम आजही दिसून येतो. राजकारण, समाजकारण व प्रशासनात त्यांनी दिलेले योगदान चिरंतर राहिल. शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन माझ्यासाठी मोठी वैयक्तिक हानी आहे. डॉ. शंकरराव चव्हाण व त्यांचे बंधुत्वाचे नाते होते. मागील अनेक वर्षांपासून दोन्ही कुटुंबात आत्मियतेचे संबंध राहिले आहेत. सार्वजनिक कार्यात त्यांनी मला नेहमीच मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केल्याचे खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत मालमत्ता, पाणीपट्टी करात ५० टक्के सवलत

## डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीकडून नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत, चालू वर्षाच्या करासह थकबाकीची ५०% रक्कम एकाच वेळी भरल्यास, निवासी मालमत्ताधारकांना पाणी पट्टी आणि घरपट्टीच्या थकबाकीत ५०% सवलत मिळणार आहे. त्याच अनुषंगाने भिवंडी तालुक्यातील डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत नागरिकांना मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती करामध्ये ५० टक्के सवलत जाहीर केली आहे. ही सवलत फक्त अभियान कालावधीत म्हणजे ३१ डिसेंबरपर्यंत लागू असणार आहे. योजनेनुसार, ग्रामपंचायत हद्दीतील निवासी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कराच्या थकबाकीवर ५० टक्के सवलत दिली जाईल. नागरिकांना चालू २०२५-२६ या वर्षाचा पूर्ण कर एकरकमी भरावा लागणार आहे. तसेच १ एप्रिलपूर्वीची थकबाकी भरता ५० टक्के सवलत लागू होईल. मात्र, थकबाकीवरील सवलतीची उर्वरित रक्कमही एकरकमीच भरावी लागणार असल्याचे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे.

या योजनेला प्रतिसाद मिळत असून नागरिकांनी थकबाकी व चालू वर्षाचा कर भरून सवलतीचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे.तर या निवासी मालमत्ताधारकांना पाणी पट्टी आणि घरपट्टीच्या थकबाकीत ५०% सवलत मिळण्याचे आवाहन डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतिच्या वतीने करण्यात आले आहे.याच अनुषंगाने ग्रामपंचायत मार्फत सलग पाच दिवस प्रत्येक गावात घरापट्टी वसुली बाबत तसेच मोफत "आयुष्यमान कार्ड" शिबीर आयोजित करण्यात आले आहे




सदर शिबिर १५डिसेंबर रोजी कोशिंबी येथे होणार आहे तर १६ डिसेंबर रोजी कळंबोली, १७ डिसेंबर रोजी सौर,१८ डिसेंबर रोजी आन्हे, १९ डिसेंबर रोजी डोहोळे येथे सकाळी १० ते दुपारी ०१ वाजे पर्यंत आयोजित करण्यात आले असून शिबिराचे लाभ घेण्याचे आवाहन डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतिच्या वतीने करण्यात आले आहे.

# दिव्यातील होली एंजल इंग्लिश स्कुलमध्ये लसीकरण मोहीम संपन्न




**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी शालेय मुलांचे वेळोवेळी लसीकरण करणे तितकेच महत्त्वाचे असते. म्हणूनच आज दिव्यातील साबेगाव येथील होली एंजल इंग्लिश स्कूल आणि जूनियर कॉलेज मध्ये ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत टेटानस वॅक्सीन कॉम्पिशनचे आयोजन करण्यात आले होते.

दहा ते बारा वर्ष वयोगटातील शालेय मुलांना तसेच सोळा वर्ष वयोगटातील मुलांना ही लस देण्यात आली. प्रसंगी शाळेतील शंभर पेक्षा अधिक मुलांनी ही लस घेतली.

# शेतीला दिवसा वीज पुरवठा करा : आ. श्रीजया चव्हाण

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

दि. १२ डिसेंबर रोजी बिबट्यांसारख्या वन्यप्राण्यांचे हल्ले होण्याच्या घटना सतत होत असल्याच्या पार्श्वभूमिवर शेतीला रात्रीऐवजी दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी भोकर विधानसभा मतदारसंघाच्या भाजप आमदार श्रीजया चव्हाण यांनी आज विधानसभेत केली.




सभागृहात मागणी केल्यानंतर याबाबत माहिती देताना त्या म्हणाल्या की, सध्याच्या काळात ऊस, केळी, गहू, हरभरा, हळद सारख्या पिकांना पाणी देण्याची गरज असते. त्यासाठी पंप सुरु करायला शेतकऱ्यांना शेतात जावे लागते. सध्या शेतीला शिफ्टमध्ये वीज पुरवठा केला जातो. वीज पुरवठ्याची वेळ रात्रीची असेल तर शेतकऱ्यांना नाईलाजाने रात्रीच्या अंधारात शेतात जावे लागते. रात्रीच्या वेळी वन्यप्राण्यांचे हल्ले होण्याची शक्यता जास्त असते. वन्य प्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीती निर्माण झालेली आहे. या पार्श्वभूमिवर शेतीला दिवसाच्या काळातच सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत वीज पुरवठा करणे आवश्यक आहे. त्यानुसार वीज पुरवठ्याच्या वेळापत्रकात आवश्यक त्या सुधारणा तात्काळ कराव्यात, अशी मागणी नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने केल्याचे आ. श्रीजया चव्हाण यांनी सांगितले.

# त्या रस्त्याच्या कामाला अखेर सुरुवात

- आ. डॉ. तुषार राठोड यांच्या पाठपुराव्याला यश

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



राज्य महामार्ग क्रमांक १६ च्या शेल्लाळी ते सावरगाव (नि.) रस्त्याचे काम गेली अनेक वर्षांनी बंद पडले होते. याच रस्त्याने रोज लहान-मोठे अपघात घडत होते मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघाचे कर्तबगार आमदार डॉ.तुषार राठोड यांनी सतत पाठपुरावा करून pwd च्या माध्यमातून कामाला सुरवात केली असल्याने आ.डॉ. तुषार राठोड व सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिसरातील नागरिक आणि वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले आहे.

सदरील राज्य महामार्गाचा रस्ता शेल्लाळी ते सावरगाव (नि) दरम्यान साधारणतः तीन ते चार किलोमीटर अंतराचा (फॉरेस्ट) वनविभागाच्या नाहरकतीमुळे रखडला होता. त्यामुळे या रस्त्यावरील वाहनधारक वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत होती.त अनेक वर्षांच्या प्रतीक्षेमुळे या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. मुखेड कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड यांनी या रखडलेल्या रस्त्यासाठी मंत्रालयात वेळोवेळी पाठपुरावा केला होता. याकामी सा.बां.वि.चे उपअभियंता सुमित पाटील आणि अभियंता बी.शेबाळे यांनीही वेळोवेळी मदत केली आहे.

वनविभाची परवानगी मिळताच रखडलेल्या रस्त्याच्या

# एशियन हॉस्पिटलचे मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

हदगाव तालुक्यातील तामसा परीसरात नामांकित दवखाण्याचे तज्ञ डॉक्टर च्या वतीने जिल्हा परिषद हायस्कूल तामसा या ठिकाणी सावित्री बाई फुले प्रतिष्ठान खरटवाडी यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांना एशियन हॉस्पिटल चे मोफत आरोग्य शिबीर दि. १४ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले असून या ठिकाणी रुग्णांनी लाभ घेण्याचे आव्हान समन्वयक डॉ.गंगाधर बुढला यांनी केले आहे तामसा येथील जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी हैद्राबाद येथील एशियन व्हास्कुलर हॉस्पिटल च्या माध्यमातून ग्रामीण शहरी भागातील रुग्णांना मोफत वैद्यकीय तपासणी दि १४ डिसेंबर रोजी सकाळी १० ते ४ वाजे पर्यंत करण्यात येणार आहे. या ठिकाणी तज्ञ डॉक्टर ची सर्व टीम या ठिकाणी वेग वेगळ्या आजारावर तपासणी करणार असून हैद्राबाद या ठिकाणी त्यांचे मोफत सर्जरी ही करण्यात येणार आहे.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१२५/२०२५ अकोले दि. १२/१२/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. प्रकाश सोमा पथवे, रा. टाकळी,** ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **यांचा मुलगा कु. अक्षय प्रकाश पथवे याचा जन्म दि. २८/०६/२००८ रोजी आईच्या माहेरी दिगंबर** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **दिगंबर,** ता. अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. प्रकाश सोमा पथवे, रा. टाकळी,** ता.अकोले, जि. अहिल्यानगर **यांचा मुलगा कु. अक्षय प्रकाश पथवे याचा जन्म दि. २८/०६/२००८ रोजी आईच्या माहेरी दिगंबर** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **दिगंबर,** ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १२/१२/२०२५ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
कामगिरी क्लर्क
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

# ८८ वे स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ जल्लोषात

## १५०० विद्यार्थ्यांनी दाखविला कलाविष्कार चिमुकल्या विद्यार्थ्यांनी घडविले गुणदर्शन

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर शाळेचे स्नेहसंमेलन दादासाहेब गायकवाड सभागृहात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवन, सरस्वतीपूजन व दीपप्रज्वलन करून झाली. हर्षभराने करितो स्वागत हे स्वागतगीत क्रांती बोराटे व इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. रंगमंच पूजन राहुल चव्हाण यांनी केले. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. पारितोषिक समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध मराठी अभिनेता चिन्मय उदगीरकर उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर संस्था उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे संस्था ,उपाध्यक्ष अॅड.जयदिप वैशंपायन,कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समिती अध्यक्षा रंजना परदेशी, संस्था कार्यवाह तथा शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र निकम, संस्था सहकार्यवाह शैलेश पाटोळे,पेठे विद्यालयाचे मुख्याध्यापक गंगाधर बदादे, उंटवाडी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा बोरसे,पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष कोमल जोशी,शिक्षक प्रतिनिधी अशोक शिरुडे, मनिषा जोशी,विजया दुधारे,शालिनी बच्छाव आदी उपस्थित होते. आपल्या मनोगतातून शाळेचे माजी विद्यार्थी सुप्रसिद्ध अभिनेते चिन्मय उदगीरकर यांनी पर्यावरणाचा संदेश देऊन सांस्कृतिक कार्यक्रम हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी असल्याचे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणातून शालेय समिती अध्यक्षा रंजना परदेशी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रस्तुत कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापक राजेंद्र निकम यांनी तर सूत्रसंचालन हर्षल कोठावदे यांनी केले. कार्यक्रमातील प्रमुख पाहुण्यांचा परिचय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राजक्ता क्षीरसागर यांनी करून दिला. आभार शिक्षक प्रतिनिधी अशोक शिरुडे यांनी मानले शालेय अहवालाचे वाचन विजया दुधारे यांनी तर पालक शिक्षक संघाच्या अहवालाचे वाचन कोमल जोशी यांनी केले.पारितोषिक यादीचे वाचन उषा जोपळे, अनघा कुलकर्णी,स्वाती महाजन,किशोरी शुक्ल यांनी केले. याप्रसंगी १०४ गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यानंतर १ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याचा कलाविष्कार दाखविला. सांस्कृतिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन सारिका सूर्यवंशी,नलिनी पाडवी, सुषमा यादव, वैशाली खिल्लारी यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# सरकारने तातडीने विशेष सवलती, आर्थिक मदत जाहीर करावी : आ. अंतापूरकर

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

देगलूर- बिलोली तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरिप पिकांचे मोठे नुकसान झाले असून सरकारने तातडीने विशेष सवलती व आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी आमदार जितेश अंतापूरकर यांनी सभागृहात केली आहे.तालुक्यांत सोयाबीन पिकावर डाग, तुटके-फुटके धान्य वाढल्याने शेतकऱ्यांना बाजारात कमी दराचा सामना करावा लागत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. नाफेडच्या हमीभाव खरेदी केंद्रांवर लागू असलेली नियमावली ही अतिवृष्टीग्रस्त सोयाबीनसाठी अयोग्य ठरत असून शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे,असे मत अंतापूरकर यांनी नोंदवले. अतिवृष्टीमुळे खराब झालेले,



डागाळलेले किंवा तुटके धान्य असलेले सोयाबीन नाफेड स्वीकारत नसल्याने शेतकऱ्यांना दलालांना कमी दरात विक्री करावी लागत आहे."शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही यासाठी नाफेडने खरेदी अटी तात्काळ शिथिल कराव्यात अशी ठाम भूमिका आ.अंतापूरकरांनी नागपूर येथे चालू असलेल्या हिवाळी अधिवेशनात मांडली.पिकविमा 'औपचारिक योजना' नव्हे तर 'संरक्षण कवच' व्हावा पिकविम्याची स्थितीही गंभीर असल्याचे सांगताना अंतापूरकर म्हणाले की,शेतकरी वेळेवर विमा प्रीमियम भरतो; मात्र पंचनामे उशिरा होतात मदत जाहीर होण्यासाठी विलंब होतो आणि मंजूर मदत वितरित होण्यास आणखी विलंब त्यामुळे पिकविमा योजना कागदी स्वरूपातच अडकून राहते. पिकविमा कंपन्यांवर सरकारने कडक अंकुश ठेवावा, तसेच शेतकरीहिताची ठोस नियमावली लागू करून पिकविम्याला प्रत्यक्ष संरक्षण कवचाचे स्वरूप द्यावे,अशी त्यांनी मागणी केली. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची सवलत व आर्थिक मदत जाहीर करावी.सोयाबीन हमीभाव खरेदीतील एफएक्यू नियमावली त्वरित शिथिल करावी.नाफेडने डागाळलेले/ तुटके-फुटके सोयाबीन स्वीकारावे. पिकविम्याचे पंचनामे वेळेवर करून मदतही तत्काळ वितरित करावी.पिकविमा कंपन्यांवर कारवाई करून शेतकरीहित नियमावली लागू करावी.

# रंगोत्सव स्पर्धा उत्साहात साजरी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

रंगोत्सव स्पर्धा 2012 मध्ये भारतामध्ये सुरू झाली.देशभरातील पूर्ण पाठिंब्यामुळे,शालेय विद्यार्थ्यांमध्ये कला आणि सर्जनशीलतेचे महत्व अधोरेखित करण्यासाठी शाळेमधील विद्यार्थी या स्पर्धेमध्ये सहभागी होतात. रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल,ओतूर मधील रंगोत्सव या स्पर्धेमध्ये नर्सरी ते चौथी पर्यंतच्या मुलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यामध्ये मुलांनी चित्र रंगवणे,सुंदर हस्त लेखन,दिलेल्या चित्राचे कोलाज तयार करणे,यासारख्या स्पर्धांमध्ये भाग घेतला होता.या स्पर्धांमध्ये मुलांना भरपूर,खूप छान अशी बक्षीसे , प्रमाणपत्रे, मेडल्स मिळविली.या स्पर्धेमुळे मुलांमध्ये उत्सुकता निर्माण झाली मुलांचे निरीक्षण कौशल्य वाढण्यास मदत झाली चित्रकले मुळे मुलांना आपल्या भावना व्यक्तकरण्याची संधी मिळाली.मुलांच्या




सर्जनशीलतेचा विकास होण्या साठी मदत झाली,त्याचप्रमाणे मुलांमध्ये आत्मविश्वास व आवड निर्माण झाली. या कार्यक्रमासाठी रॉयल एजुकेशन इंग्लिश स्कूल, ओतूर, चे सर्व विश्वस्त सन्माननीय डॉ.चंद्रशेखर वल्हवणकर,आत्माराम जगताप, वसंतराव तांबे, रामदास तांबे,मुख्याध्यापिका सुजाता कासार,प्रभारी मुख्याध्यापिका प्रिया भोर,त्याचप्रमाणे शाळा समन्वयक परिघा कदम,अध्यापिका प्रिया भोर, स्वप्राली औटी,हिना इनामदार,अश्विनी शिंगोटे,राणी सातपुते,शमा तांबोळी,आरती देशमुख,सोनिया शिंगोटे नम्रता कुलकर्णी,शितल नलावडे,दिपिका शेटे या सर्वांनी सहकार्य केले.

# योगीराज गाडे आयोजित मोफत सर्व रोग निदान शिबिर संपन्न



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगरसेवक योगीराज गाडे यांच्या वतीने नगर प्रभाग क्र. ३ मधील सिव्हिल हडको येथील सारडा वसतिगृहात सर्वासाठी साई माऊली हॉस्पिटल व अंजली चष्मावाला यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या मोफत सर्व रोग निदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.नेत्र तपासणी, चष्मा वाटप मोतीबिंदू - शस्त्रक्रिया संदर्भ मार्गदर्शन, गुढघे,कंबरदुखी यासह विविध तपासण्या या शिबिरात मोफत करण्यात आल्या.

या शिबिरास लोकनेते खासदार निलेश लंके यांचे बंधू दीपक अप्पा लंके यांनी खास भेट दिली व नागरिकांशी संवाद साधला. शहरातील अशा उपक्रमांमुळे सामान्य जनतेला मोठा दिलासा मिळतो असे त्यांनी यावेळी सांगितले. त्यांच्यासोबत सागर भगत,काका शेळके,प्रथमेश मैंदनकर,कृष्णा ढाले,एस. बी. भोसले सर, संजय पवार सर, संदीप मते इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगरसेवक योगीराज गाडे म्हणाले, सामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे ही माझी प्रथम जबाबदारी आहे.

आर्थिक अडचणीमुळे कोणीही उपचारांपासून वंचित राहू नये, म्हणूनच अशा मोफत तपासणी शिबिरांचे नियमित आयोजन करण्याचा माझा संकल्प आहे. तर दीपक लंके यांनी गेली अनेक वर्षे राबविण्यात येणाऱ्या योगीराज गाडे यांच्या या शिबिराचे कौतुक करून शुभेछया दिल्या त्यांच्या हस्ते चष्मा वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे परिसरातील शेकडो नागरिकांनी विविध तपासण्या करून घेतल्या तसेच मोफत चष्म्याचाही लाभ घेतला.

# स्वप्निल बुलाखे याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य,पुणे आणि



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित शालेय राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धा गोंदिया येथे उत्साहात पार पडल्या या स्पर्धेत अहिल्यानगर येथील आर्मी पब्लिक स्कूलचा विद्यार्थी स्वप्रील महादेव बुलाखे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले याची होणाऱ्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# दिव्यांग कर्मचाऱ्यांची यादी अहिल्यानगर जिल्हा परिषद संकेतस्थळावर

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

दिव्यांग विभागाच्या आदेशानुसार जिल्हा परिषद प्रशासनाने गेल्या महिनाभरात जिल्हाभरातील अंपग कर्मचाऱ्यांच्या केलेल्या पडताळणीत जिल्ह्यात ५५० अंपग कर्मचारी आढळून आलेले आहेत. यापैकी २८९ कर्मचाऱ्यांचे अंपगत्व हे डोळ्यांनी दिसत असून उर्वरित २५४ कर्मचाऱ्यांच्या अंपगत्वाबाबत जिल्हा परिषद प्रशासनाला खात्री होत नसल्याने अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या अंपगत्व, अंपगत्व प्रमाणपत्र (युडीआयडी) नंबर याची आरोग्य उपसंचालक कार्यालयामार्फत तपासणी करण्यात येणार आहे.

दरम्यान, जिल्ह्यात सापडलेल्या ५५० कर्मचाऱ्यांची यादी गुरूवारी सांयकाळी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असणाऱ्या दिव्यांग



अधिकारी व कर्मचारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्राचे युडीआयडी कार्ड, तसेच या कर्मचाऱ्यांनी सेवेसह अन्य योजनांचा घेतलेला लाभ याबाबत राज्य दिव्यांग विभागाकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी झाल्या. यामुळे राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेने त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांपैकी दिव्यांग कर्मचारी व त्यांचे प्रमाणपत्र (युडीआयडी) याची पडताळणी करण्याचे आदेश राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे यांनी महिन्यांपूर्वी दिले होते. मुंडे यांच्या आदेशानंतर नगर जिल्हा परिषदेने दिव्यांग कर्मचारी व त्यांच्या प्रमाणपत्रासह युडीआयडीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.

यासाठी जिल्हा परिषद प्रशासन ॲक्शन प्लॅन तयार केला आणि अपंग प्रमाणपत्र सादर केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे, अपंग कोठ्यातून विविध सवलती घेतलेल्या कर्मचाऱ्यांची पडताळणी केली.

यात जिल्हा परिषदेकडे कार्यरत असणारे ५५९ कर्मचारी अंपग असल्याचे समोर आले. यातील २८९ कर्मचाऱ्यांचे अपंगत्व हे प्रथमदर्शनी डोळ्यांनी दिसत आहे. मात्र, २५४ कर्मचाऱ्यांचे अपंगत्वाबाबत प्रशासनाला शंका आहे. यात कर्णबधीर, अल्पदृष्टी आणि ४० टक्क्यांपेक्षा जादा अस्थिव्यंग असणारे कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या सर्व कर्मचाऱ्यांची यादी जिल्हा परिषद प्रशासन पडताळणीसाठी आरोग्य उपसंचालक यांना पाठवणार आहे. यात हे अपंग बनावट अपंग आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येवून त्यांचा अहवाल दिव्यांग कल्याण विभागाला पाठवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# माळीवाडा वेस पाडू नका : खा. नीलेश लंके यांची मागणी

■ ऐतिहासिक वारसा संरक्षणाचा मुद्दा केंद्रस्थानी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर शहरातील प्राचीन आणि ऐतिहासिक ओळख असलेली माळीवाडा वेस पडण्याच्या हालचालींना खासदार नीलेश लंके यांनी जोरदार विरोध दर्शविला आहे. महापालिका आयुक्तांना पाठवलेल्या सविस्तर निवेदनात त्यांनी राज्यघटनेतील कलम ४९ चा थेट दाखला देत वेशीचे संरक्षण, संवर्धन आणि पुनरुज्जीवन करण्याची राज्याची सक्त जबाबदारी अधोरेखित केली आहे.

खासदार लंके यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, "माळीवाडा वेस पाडणे हा निर्णय केवळ अविवेकीच नव्हे तर संविधानिक दृष्ट्या चुकीचा ठरेल. राज्यघटनेने संरक्षित



मानलेल्या वारशावर कुणालाही हात टाकण्याचा अधिकार नाही."

खा.लंके यांनी त्यांच्या निवेदनात भारतीय राज्यघटनेच्या कलम ४९ चा उल्लेख करत माळीवाडा वेशीचा ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट केले आहे. या कलमानुसार, राज्याने प्रत्येक ऐतिहासिक व कलात्मक महत्वाच्या वास्तूचे संरक्षण करणे बंधनकारक आहे.त्यामुळे महापालिकेने वेस पाडण्याचा विचार करणेच संविधानभंगासमान असल्याचे त्यांनी स्पष्ट खासदार लंके यांनी वेशीचे सांस्कृतिक, सामाजिक व ऐतिहासिक महत्व विशेषत्वाने मांडले. त्यांनी नमूद केले की ही वेस १४९०-१४९४ मधील नगर स्थापनेशी निगडित आहे.निजामशाही तटबंदीचा एक प्रमुख भाग व शहाजहानकालीन किल्लेदार सर्जेखानाने बळकट केलेली १८०३ च्या ब्रिटिश-मराठा युद्धाची साक्ष आहे. ही वेस महात्मा फुले पुतळा (१९५९) आणि पहिल्या एसटी बसेसच्या प्रारंभाशी संबंधित असून शहरातील सामाजिक, सांस्कृतिक, पत्रकारिता व जनचळवळींचे केंद्र आहे. अशा सर्व घटकांसह वेस स्वतःमध्ये नगरचा इतिहास 'जिवंत दस्तऐवज' असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खासदार लंके यांनी निदर्शनास आणले की कलम ४९ मध्ये "संरक्षित" हा शब्द स्पष्ट आहे. त्यामुळे संरक्षण करणे हेच शासनाचे कर्तव्य असून 'उध्वस्त' हा शब्द राज्याच्या अधिकारातच बसत नाही. त्यामुळे महापालिका व राज्य सरकार या दोघांनीही वेस पाडण्याचा निर्णय घेणे हा कायद्याचा भंग ठरेल, असा इशारा त्यांनी दिला.

खासदारांनी महापालिकेला विकासासाठी रचनात्मक पर्यायही सुचविले आहेत. त्यात वेस कायम ठेवून रस्त्याची पुनर्रचना, वाहतूक वळविण्याचे नियोजन, परिसराला 'हेरिटेज कॉरिडॉर' घोषित करणे तसेच सुशोभीकरण, प्रकाशयोजना, सुरक्षा भिंत,आठवडी बाजार आणि हेरिटेज वॉक माहिती केंद्र यांचा समावेश आहे. खासदार नीलेश लंके यांनी आयुक्तांकडे काही मागण्या केल्या, त्यात माळीवाडा वेस पाडण्याचा किंवा हलविण्याचा कोणताही प्रस्ताव तात्काळ स्थगित करावा. वेशीला "ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा स्थळ" म्हणून अधिकृत संरक्षण द्यावे. महापालिकेने वेशीचे संवर्धन, दुरुस्ती व सुशोभीकरण तत्काळ हाती घ्यावे.

# मनपा मालमत्ता सर्व्हेक्षणात आर्थिक नुकसान

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**


महानगरपालिका हद्दीतील संपुर्ण मालमत्ता सर्व्हेक्षणाबाबत मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान घोटाळ्याबाबत रवींद्र वखारे यांनी आरोप केला असून त्यांना मिळालेल्या माहितीचा अधिकार अधिनियम अन्वये मिळालेल्या माहितीनुसार त्यानी अर्ज केला आहे त्याला ३ महिन्यात मनपा कडून उत्तर मिळाले नाही असे प्रतिपादन रवींद्र वखारे यांनी केले. त्यांनी यासंदर्भात प्रधान सचिव नगर विकास मंत्रालय, व आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, याना निवेदन दिले असून सुमारे २० कोटी रुपयाचे नुकसान झाल्याच्या त्यांचा आरोप आहे निवेदनात म्हटले आहे कि मनपा हद्दीतील अंदाजे १,४०,००० (जमीनी व इमारतीचे) सर्व्हेक्षण करणेकामी मे.सि.ई. इन्फो सिस्टिम लि. या कंपनीला १२ महिन्याच्या आंत करारनाम्यातील अटी व शर्तीस अधीन राहुन कार्यारंभ आदेश दिलेला आहे.

# सुसंस्कृततेचा लौकिक जपणाऱ्या उत्तुंग नेतृत्वाला मुकलो

**लातूर : (समर्थ गांवकरी)**

माजी केंद्रीय गृहमंत्री तथा राजकीय क्षेत्रातील एक सुसंस्कृत, अभ्यासू व्यक्तिमत्त्व लातूरचे सुपुत्र शिवराज पाटील चाकूरकर यांचे शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता येथील देवधर या त्यांच्या निवासस्थानी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने एक अनुभवी, सुसंस्कृत, चारित्र्यसंपन्न राजकारणी गमावला असून, कॉंग्रेस पक्षाची अपरिमित हानी झाली आहे.


महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्राच्या शालीनता, सुसंस्कृततेचा लौकिक जपणारे आणि तो राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचविणारे नेतृत्व म्हणून ज्येष्ठ नेते शिवराज पाटील-चाकूरकर सदैव स्मरणात राहतील, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय मंत्री शिवराज पाटील-चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनामुळे



राजकारण- समाजकारणातील उत्तुंग अशा मार्गदर्शक नेतृत्वाला मुकलो आहोत, अशी शोकभावना मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी संसदेशी निगडित अनेक अभिनव उपक्रमांना आवर्जून चालना दिली. चाकूरकर यांचा वकील म्हणून संविधानाचा गाढा अभ्यास होता. त्यातूनच त्यांनी लोकसभेतील संसदीय कार्य प्रणाली आणखी बळकट केली. तत्वनिष्ठ, अभ्यासपूर्ण आणि ठामपणे मांडणी करणारे नेतृत्व म्हणून त्यांना देशाच्या राजकारणात आदराचे स्थान होते. चाकूरकर यांच्या निधनामुळे राजकारण - समाजाकारणात सभ्यता, सुसंस्कृतता जपणारे, लोकशाहीवर गाढा विश्वास असणाऱ्या ज्येष्ठ नेतृत्वाला महाराष्ट्र सुपुत्राला आपण मुकलो आहोत. या क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, असे मानतो. चाकूरकर कुटुंबीय आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर आघात झाला आहे. या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी असून, ईश्वराने त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद द्यावी अशी प्रार्थना करतो आणि ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी म्हटले आहे.

# क्राफ्ट मेकिंग विषयावरील मार्गदर्शन व प्रशिक्षण



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

गुरुवार दिनांक 11 डिसेंबर 2025 रोजी तळेरान येथे चाईल्डफंड इंडिया प्रकल्पांतर्गत क्राफ्ट मेकिंग तसेच सामाजिक आणि भावनिक कौशल्य विकासावर आधारित शिक्षण सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रामध्ये तळेरान येथील सर्व मुले शिक्षकवर्ग उत्साहाने सहभागी झाला.एकूण ६२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. क्राफ्ट मेकिंगचे उत्कृष्ट प्रशिक्षण प्रशिक्षक हिंदुराव गेजगे यांनी दिले.तसेच कार्यक्रमाला तळेरान गावचे लोकनियुक्त सरपंच गोविंद साबळे, माजी उपसरपंच प्रवीण कोकाटे,मुख्याध्यापक शामल पाटे,शिक्षक राहुल कोरडे आणि अमोल चव्हाण यांची मान्यवर उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन चाइल्डफंड इंडिया समुदाय संघटक योगेश मस्करे यांनी केले असून त्यांना अजित सौर यांनी मार्गदर्शन केले. तसेच संपूर्ण उपक्रमाचे मार्गदर्शन प्रकल्पाधिकारी अभिजीत मदने यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.या सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता,सामाजिक जाण,टीमवर्क आणि भावनिक विकासाला चालना मिळाली असून हा उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

# श्री रंगदास स्वामी पुण्यतिथी शतकोत्तर महोत्सवाची तयारी

## ८५ कढईमध्ये आमटीसाठी २१ लाख रुपयांचा मसाला

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

आणे ता:-जुन्नर येथील पारंपरिक चवीच्या "आमटी-भाकरी" महाप्रसादासाठी प्रसिद्ध असलेला श्री रंगदास स्वामी महाराज पुण्यतिथी शतकोत्तर महोत्सव सोहळा येत्या शनिवार दि:-२०,रविवार दि:-२१ साजरा होणार असून,यावर्षीच्या आणेची प्रसिद्ध आमटी बनवण्यासह मसाल्याचा एकूण खर्च जवळ पास २१ लाख रुपये असणार आहे,अशी माहिती देवस्थान संस्थेचे अध्यक्ष मधुकर दाते व उपाध्यक्ष अनिल आहेर यांनी दिली.श्री रंगदास स्वामी महाराज पुण्यतिथी शतकोत्तर महोत्सव सोहळ्या निमित्त शनिवारी दुपारी १२ वाजता स्वामींची



महाआरती होणार असून,त्यानंतर आमटी- भाकरी महा प्रसाद वाटपाला सुरुवात होईल व रविवारी काल्याचे कीर्तन होणार असून या दिवशीही आमटी-भाकरी महाप्रसाद वाटप सुरू राहील.

श्री रंगदास स्वामी महाराज पुण्यतिथी उत्सव सोहळ्याचे हे १३८ वे वर्ष आहे दरम्यान,शनिवार दि:- १३ ते रविवार दि:-२१ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण होणार आहे दरम्यान आगामी सन २०३३ पर्यंत आमटी महाप्रसाद बनवण्यासाठी मसाल्यासह लागणाऱ्या खर्चाचे देणगीदारांचे अगोदरच बुकिंग झालेले असल्याचे सांगण्यात आले.

याठिकाणी ग्रामस्थांसह परिसरा तील नागरिक बाजरीच्या भाकरी बनवून वाजत-गाजत आणून देतात दरम्यान,गेल्यावर्षीपासून देवस्थान संस्थेच्या वतीने १०० व २५० ग्राम पॅकिंग मध्ये 'श्रीरंग सात्त्विक आमटी मसाला' नावाने भाविकांना मागणीनुसार मसाला उपलब्ध करून देण्यात येत आहे तसेच ५ लिटर क्षमतेच्या किटली मध्ये भाविकांना अल्प किमतीत घरी नेण्यासाठी आमटी महाप्रसाद देण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे.

शेंगदाणा तेल :- ८० डबे, खोबरे :-८०० किलो, लवंग :- ३०किलो,हिंग :- ४० किलो, जिरे :- ४० किलो, मोहरी : ४० किलो, खसखस : ४० किलो, गूळ : ८० किलो,कोकम :-१७८ किलो,धना :-३६२किलो याशिवाय तूरडाळ असा सर्व मिळून एकूण दोन हजार ४३ किलो निव्वळ मसाला वापरला जाणार आहे.


पुण्यतिथी महोत्सव सोहळ्याच्या दोन दिवसांत देणगीदारांच्या देणगीतून ५०० लिटर क्षमतेच्या एकूण ८५ कढया आमटी बनवली जाणार आहे. साधारणपणे एक कढई आमटी महाप्रसाद बनवण्यासाठी अंदाजे २५ हजार रुपये खर्च येतो.यावर्षी प्रत्येकी ८ कढया आमटी बनवण्यासाठी लागणारा खर्च देणारे ९ दानशूर अन्नदाते असून प्रत्येकी १ कढई आमटी बनवण्यासाठी लागणारा खर्च देणारे १३ दानशूर अन्नदाते आहेत.

# विनम्रता, निष्कलंक समर्पण आणि मूर्तिमंत सौजन्य



## संपादकीय

निजामाच्या राजवटीत मागासलेपणाचा ठसा उमटलेल्या मराठवाड्याला नवी दिशा देण्यासाठी व प्रगतिपथावर अग्रेसर करण्यासाठी मराठवाड्यातल्या काही महान रत्नांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. यामध्ये देशाचे माजी गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण, डॉ. शिवराज पाटील चाकूरकर, विलासराव देशमुख व गोपीनाथ मुंडे यांची नावे प्राधान्याने घ्यावी लागतील. मागील दोन दशकांत यापैकी तिघांनी ईहलोकाचा निरोप घेतला आणि आज शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाची मन सुन्न करणारी बातमी आली. १२ ऑक्टोबर १९३५ रोजी जन्मलेल्या डॉ. शिवराज पाटील चाकूरकर यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीमध्ये अनेक महत्त्वपूर्ण पदांवर काम केले. १९६६ मध्ये वयाच्या ३१ व्या वर्षी लातूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदावरून सुरू झालेली त्यांची कारकीर्द पंजाबच्या राज्यपालपदापर्यंत पोहोचली. १९७२ ते १९८० या काळात त्यांनी लातूर विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व केले. याच काळात विधानसभेचे उपाध्यक्ष व त्यानंतर अध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. १९८० मध्ये त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली. २००४ पर्यंत ते सतत सहा वेळा विजयी झाले. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला. मात्र, त्यानंतरही त्यांच्यावर देशाच्या गृहमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली. या कालावधीत त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. दरम्यानच्या काळात केंद्रीय वाणिज्य, विज्ञान व तंत्रज्ञानमंत्री म्हणून काम केले. लोकसभेचे सभापती, उपसभापती आदी पदांवर काम करण्याचा मोठा अनुभव त्यांना मिळाला. याच काळात लोकसभेचे थेट प्रक्षेपण दूरदर्शनवरून करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतला व त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. त्यांच्या राजकीय जीवनात अनेक चढउतार आले. मात्र, ते कधीच नकारात्मक भूमिकेत गेले नाहीत. जवळपास पाच दशकांची त्यांची कारकीर्द निष्कलंक राहिली. राज्य व राष्ट्रीय पातळीवर त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण पदे भूषवली. मात्र, त्यांना कधीही अहंभाव साधा स्पर्शसुद्धा करू शकला नाही. शिस्त, नम्रता, साधनशुचिता व समर्पणाचे ते प्रतीक होते. त्यांच्या विनम्रतेचे व सौजन्याचे दाखले अनेक जण देत असतात. माझे वडील डॉ. शंकरराव चव्हाण व डॉ. शिवराज पाटील चाकूरकर यांचे बंधुत्वाचे नाते होते. दोघांची सार्वजनिक कारकीर्द साधारणतः १०-१५ वर्षांच्या अंतराने सुरू झाली. मात्र, त्यात संयोगाने अनेक साम्य होते. दोघांच्याही राजकीय जीवनाची सुरुवात स्थानिक स्वराज्य संस्थांमधून झाली. डॉ. शंकरराव चव्हाण हे तत्कालीन नांदेड नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून काम करू लागले. दशकभराचा कालावधी लोटल्यानंतर शिवराज पाटील चाकूरकर यांनाही लातूर नगरपालिकेचे अध्यक्ष होण्याचा बहुमान मिळाला. दोघेही आपली कामाची शैली व जनतेप्रति समर्पणाची भावना यामुळे लोकप्रिय होते. विनम्रता, अभ्यासुवृत्ती, इतरांविषयी आदरभाव, कामाप्रति असलेले समर्पण व मराठवाड्याच्या विकासासाठीचा आग्रह असे अनेक समान गुण त्यांच्यात होते. दोघांनीही वैयक्तिक कामांपेक्षा सार्वजनिक कामांवर अधिक भर दिला.



## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ५८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 6 | 4 | | 8 | 2 | | 7 |
| | 3 | 8 | 1 | 2 | 6 | | | |
| 1 | | | | | | | 6 | |
| | | 5 | | | | | | 4 |
| 9 | | | 7 | | 1 | | | 3 |
| 2 | | | | | | 5 | | |
| | 8 | | | | | | | 2 |
| | | | 6 | 7 | 5 | 4 | 8 | |
| 4 | | 7 | 9 | | 2 | 6 | 3 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे. या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ५७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 8 | 3 | 4 | 6 | 1 | 2 | 7 | 5 |
| 4 | 7 | 6 | 8 | 2 | 5 | 1 | 3 | 9 |
| 5 | 2 | 1 | 9 | 7 | 3 | 4 | 6 | 8 |
| 8 | 6 | 4 | 2 | 1 | 9 | 7 | 5 | 3 |
| 7 | 1 | 9 | 3 | 5 | 8 | 6 | 2 | 4 |
| 3 | 5 | 2 | 7 | 4 | 6 | 8 | 9 | 1 |
| 1 | 9 | 7 | 5 | 8 | 2 | 3 | 4 | 6 |
| 6 | 4 | 5 | 1 | 3 | 7 | 9 | 8 | 2 |
| 2 | 3 | 8 | 6 | 9 | 4 | 5 | 1 | 7 |

**पंचांग**
१३डिसेंबर२०२५
सनिवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:नवमी १६:३८:१६

नक्षत्र:हस्त (अहोरात्र)
योग:आयुष्मान
११:१५:५६
करण:गर १६:३८:१६
करण:वणिज
२९:४१:०४+

## उपदेशाचे डोस

बंगाली साहित्यातील एक युगपुरुष मायकेल मधुसूदन दत्त हे एकदा पूर्व बंगालच्या पाटनगरीत एका शहरास गेले होते तेव्हा तेथील साहित्यप्रेमी युवकांनी त्यांना मानपत्र दिले. आता मानपत्रांची भाषा म्हणजे फुलोरा आलाच. त्या युवकांनी लिहिले होते, आपली विद्या, आपली बुद्धी, आपली प्रतिभा यांच्या तेजाने आम्ही साहित्यरसिक प्रफुल्लवदन झालो आहोत. फक्त एका गोष्टीचा विषाद वाटत होता. आम्ही ऐकले होते की, आपण इंग्रज झाला आहात. (कारण त्यांनी एका इंग्रज मडमेशी संसारही थाटला होता) पण आपल्या आचरणाने आणि आपल्या संभाषणाने आमची भीती अनाठायी असल्याचे सिद्ध झाले, हे नमूद करण्यास आनंद वाटतो. मधुसूदन कवींनी उत्तरादाखल म्हटले, माझ्यासंबंधी तुम्हा मंडळींचा इतर कोणताही गैरसमज समजण्यासारखा आहे. मात्र मी ‘साहेब’ झालो आहे, असं म्हणणं अन्यायाचं ठरेल. विधात्यानंच इंग्रज होण्याच्या माझ्या मार्गात खीळ घालून ठेवली आहे. माझ्या बैठकीच्या खोलीत नि निजायच्या खोलीत, अशा दोन्ही ठिकाणी मी मोठे आरसे टांगून ठेवले आहेत. साहेब होण्याची इच्छा मनात उद्भवलीच तर मी आरशात मुखडा पाहतो. तेवढी मात्रा लागू पडते. मी शंभर टक्के बंगाली आहे. इतकंच नव्हे तर मी ‘बांगाल’ (पूर्व बंगाल निवासी) आहे. जेसोर (यशोहर) चा! .

कथा उपदेश : माणूस किती मोठा झाला तरी आपले पूर्वीचे स्थान विसरत नाही.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६४२- एबल टास्मपने न्यूझीलंड बेटे प्रकाशात आणली.
- २००६- बगदादमध्ये कार बॉम्ब हल्ल्यात १० ठार, २५ जखमी.

### राष्ट्रीय

- १९७२- नारायणरावास पेशावाईची वस्त्रे मिळाली.
- २००१- आत्मघातकी अतिरेक्यांनी भारतीय संसदेवर हल्ला चढविला.
- २००६- दोहा स्पर्धेत पेस-भूपतीला दुहेरीचे सुवर्णपदक.
- २००७ - डिब्रुगडहून दिल्लीकडे जाणाऱ्या राजधानी एक्सप्रेसमध्ये आसामच्या गोलाघाट जिल्ह्यातील चुंगाजानजवळ बॉम्बस्फोट झाला. त्यात पाच प्रवासी ठार झाले.


### जन्म

- १५०६- बुडालेल्या जहाजंना सागरातळातून वर काढण्याचे तंत्र निर्माण करणारा, पाणबुडी घंटा वापरून सागरतळावर वावरता येते, हे सिद्ध करणारा इटालियन तंत्रज्ञ निकोली ताताग्लियाचा जन्म. त्याने त्रिघातसमीकरणे सोडविण्याची पद्धत शोधली.
- १९२५- सती या कथे मुळे वादग्रस्त ठरलेले साहित्यिक विद्याधर पुंडलिक यांचा जन्म.
- १९२८- सरिता पदकी यानचा जन्म.
- १९९३- आर्ची मुर या मुष्टि योद्धाचा जन्म.

### निधन

- १७८४- सॅम्युएल जॉन्सन या शब्दकोशकाराचे निधन.
- १९८६- स्मिता पाटील कालवश.
- १९९६- ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्रीधर पुरुषोत्तम तथा शिरुबाऊ लिमये यांचे निधन.
- २००७ - आय.के.टर्नर, प्रसिद्ध रॉक गायक व पॉप गायिका टीना टर्नर यांचे पूर्वाश्रमीचे पती.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ५८



**आडवे शब्द**

१. पेट्रोलशिवाय चालणारे दुचाकी वाहन
५. अगम्य
१०. ओकारी
११. प्रजाजन
१३. शब्दाला असलेला मान
१४. जबाबदारी
१५. करांगुली
१६अ. हिंदीत पकडणे, थांबवणे
१७. वेदना, अस्वस्थता (हिंदी)
१९. पुरुष
२१. पगार
२२. रेशमाचे जाडसर कापड
२४. चिनी मातीचे वाद्य
२७. बशीशिवाय एकटा
२९. भिजवलेल्या गव्हाच्या गाळसाळपासून तयार केलेली वडी
३०. पिळवटून निघणारा अवयव
३१. तेलबिया
३३. संथपणाने, सावकाशीने
३७. चोपडी
३८. लाजिरवाणे
३९. मेंदी (हिंदी)
४०. ग्रामीण बोलीत 'बेस्ट'
४२. वितरण
४४. मऊ
४६. समरस, एकरूप
४८. लक्ष्मीचे एक नाव
५१. झोप, निंद्रा
५३. भुतांचा देव (शंकर)
५५. गोसावी, भटक्या
५७. खर्चात केलेली कपात
५९. जास्तीत जास्त
६०. तात्काळ, ताबडतोब
६१. चिरणे
६३. शस्त्र, उपकरण
६३अ. गालबोट
६४. नवरदेव
६६. करपलेला भाग
६७. वृक्ष, झाड
७०. धनादेश
७१. ठाणे परिसरातील एक आदिवासी जमात
७२. जाणणारा, ओळखणारा
७३. हनुमान
७५. खाष्ट
७६. बांसरी
७७. सफल होणे
७९. बित्तबातमी देणारा
८०. खंगत जाणे
८१. लोचन

**उभे शब्द**

१. दक्ष
२. मृत्यूदेवता
३. सोने
४. इतरांहून, निराळी
८. समूळ नष्ट करणे
७. चटकन
८. ठीकठाक
९. स्त्रियांच्या पारंपारिक खेळांपैकी जोडीने येणारे दोन
११. साप
१२. चित्रपटाचा गोषवारा
१६. रंगविलेले
१८. बहुतेक
२०. रूपेरी पडदा
२३. नवऱ्याची दुसरी बायको
२५. रेशमाची गुंडाळी (अ.व.)
२६. रंग उडालेला, पांढराफटक
२८. परभारे
३२. मुलायम, मऊ
३४. सहायक, मदत करणारा
३५. सखोल, गर्द
३६. '--सज्जना भक्तीपंथेचि जावे'
४१. डोक्यावर मायेचे छत्र असलेला
४२. उपयोग
४३. 'जशास तसे' परत देणे
४५. जाड, दोरखंड
४७. शेवट
४९. भडीमार
५०. पुरोहित
५२. अटींची भाषा
५३. गतकाळ
५४. हिचे मीठही अळणी
५६. दहावी रास
५७. वेळेचा अपव्यय
५८. व्यायाम
६०अ. किडा
६१. भुकेच्या वेळी येणारा पक्ष्याचा आवाज
६२. पुन्हा
६५. छोटा, किरकोळ
६६. अश्विनातील पौर्णिमा
६८. सुंदर
६९. श्रीमंत
७४. परका, तिसरा
७८. स्वत:चे, खासगी

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ५६ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.निलाजरा ४.जखडणे ६.जननमरण १०.मनन ११.परत १२.कणीदार १४.मनावर घेणे १५.मदत १७.मसलत १९.मास्तर २०.काया २२.पराभव २४.कवायत २५.ताल २६.वट २७.पर २९.समोरासमोर ३२.रमणी ३३.खुर ३४.सलग ३५.सतीचे वाण ३६.सजा ३७.रातांधळा ३९.भाट ४१.मठ ४३.बगीचा ४५.रक्षक ४६.कल ४७.धक्काधायक ४९.लहानसहान ५०.वासर ५१.गजरा ५२.मार्जार ५३.चंद्रकोर ५६.धनी ५७.फार ५८.कळप ५९.लपंडाव ६१.तनय ६३.कपडालत्ता ६४.वनराज ६५.ददात

उभे उत्तर : २.लावणी ३.रामरस ४.जनमत ५.डराव डराव ६.जपणे ७.नर ८.नतमस्तक ९.रमत १२.कलाकार १३.दाम १६.दरवाजा १८.लसलस २०.रातसार २३.भटकंती २५.तारा २७.परवानगी २८.रमण २९.सल ३०.मोगरा ३१.मोकळा ३३.खुजा ३४.सल्लामसलत ३५.सम ३६.सटरफटर ३८.धड ४०.नोकरचाकर ४२.पक्का ४३.बकवास ४४.चाकरमानी ४६.कनकचंपक ४६अ.लस ४७.धनगर ४८.दादरा ५४.कोरडा ५५.पाडाव ५७.फायदा ५८.कप्पा ५९.लत्ता ६०.वन ६२.नद

# कंधार केंद्राची शिक्षण परिषद : बाल लैंगिक शोषणावर चर्चा

## पालकांनो बालकांना समजून घ्या

कंधारः (समर्थ गांवकरी)

अलीकडे बालकांवर अत्याचार होण्याच्या घटनेत वाढ होत आहे. माणुसकीला काळीमा फासणारा हा प्रकार किळसवाणा आणि लाजिरवाणा आहे. असा अत्याचाराचा प्रकार घडला तर बालक शिक्षकांना व आई वडीलांना सांगण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांना समजून घेतले जात नाही. आणि पुढे जाऊन त्यांचे शोषण होण्याची शक्यता निर्माण होते. अशी चिंता कंधार केंद्राच्या बाल लैंगिक शोषणावर आयोजित चर्चा सत्रात करून पालकांना जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात आले.

शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या सूचनेवरून येथील श्री शिवाजी हायस्कुलमध्ये गटशिक्षण अधिकारी वसंत मेटकर यांच्या मार्गदर्शनाखाली व केंद्र प्रमुख माधव कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी कंधार केंद्राची शिक्षण परिषद पार पडली.या शिक्षण परिषदेतून बाल लैंगिक शोषनावर जिल्हा परिषद बाभुळगाव येथिल शिक्षिका जे.एस. चोले - मुंडे यांनी चर्चासत्र घडवून शाळेतून गुड टच बॅड टच याविषयीची माहिती गरजेचे असल्याचे सांगितले.

सकारात्मक शिस्तीचे जिवनात महत्व अनन्य साधारण असते. त्यासाठी शिक्षणात शिस्त रूजविण्याचे आवाहन कोटबाजार केंद्राचे शिक्षक अलीम शेख यांनी केले. घोडज केंद्रातील उपक्रमशील शिक्षिका मनिषा वाघमारे यांनी माता पालक गटा बाबत मार्गदर्शन केले. शाळेतून माता पालक शिक्षक संघाची स्थापना करण्याचे व बैठका घेऊन बालकांना आनंददायी व गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न करण्याचे त्यांनी सांगितले. केंद्र प्रमुख माधव कांबळे यांनी १६ डिसेंबर रोजी गणपतराव मोरे विद्यालय येथे होणाऱ्या विज्ञान प्रदर्शनात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देण्या बाबत सूचना केल्या.

शिक्षण परिषदेला संजय वागलगावे, चंद्रकांत मामडे, ज्योती अवरे, गंगेश्री डोंगरे, शिवाजी कांबळे, जयवंत शिंदे, श्री शिवाजी हायस्कुल कंधारचे मुख्याध्यापक सदाशिव आंबटवाड, खाजगी शिक्षक महासंघ कंधार तालुकाध्यक्ष भास्कर पाटील कळकेकर, बसवेश्वर मंगनाळे, राजहंस शहापुरे, दिगंबर वाघमारे, साहेबराव बेळकोने,शैलेंद्र कुमार नरंगले आदीसह कंधार केंद्रातील खाजगी शाळा व जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.



## वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी परीक्षा केंद्राची विद्यापीठ प्र-कुलगुरू आणि परीक्षा नियंत्रकांकडून पाहणी

नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे घेण्यात येत असलेल्या वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी परीक्षा केंद्रावर विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ.अशोक महाजन आणि परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे यांनी भेट देऊन पाहणी केली. विद्यापीठाचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी- २०२५ च्या बी.एड.आणि बी.पीएड. या अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षा नुकत्याच सुरू झालेल्या आहेत. वसरणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात या परीक्षा सुरळीत सुरू आहेत.सदरील परीक्षा केंद्रावरील आसन व्यवस्था व इतर मूलभूत सुविधांच्या अनुषंगाने परीक्षा नियंत्रकांनी माहिती घेतली आणि परीक्षेचे अनुषंगाने मार्गदर्शक सूचना केल्या.



याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शेखर घुंगरवार, उपप्राचार्य डॉ. व्ही.आर. राठोड, केंद्र संचालक डॉ.अनिल गच्चे, सहाय्यक केंद्र संचालक प्रा.किशोर सूर्यवाड,आर. डी.राठोड, डॉ.एस. व्ही.शेटे, प्रो. डॉ. नागेश कांबळे, डॉ. संजय गिरे,डॉ.साहेबराव मोरे डॉ. आर.एम. कागणे, डॉ.व्ही व्ही मोरे, डॉ.उत्तम कानवटे,डॉ.साहेबराव शिंदे,प्रा. डॉ.संतोष शिंदे,प्रा.हाळे, प्रा. करण राठोड,डॉ.राहुल सरोदे, प्रा.नितीन मुंडलोड प्रा.धोंडगे, प्रा.वडजे,प्रा. दराडे,डॉ.गणेश ईजळकर, ,डॉ. लालबा खरात, डॉ.शशीकांत हाटकर,प्रा.समाधान दराडे,डॉ.राहुल सरोदे,प्रा.कपील हिंगोले,प्रा.नितीन मुंडलोड,प्रा.राहुल पडोळे यांसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बालाजी कोडतीवार, रियाज शेख, मारोती कांबळे यांची उपस्थिती होती.

# अहिल्यानगर कॅथलॅब सुरू होणेस विलंब का?

**आ. काशिनाथ दाते**

पारनेर : (समर्थ गांवकरी)




राज्यातील वाढत्या हृदयविकारांच्या पार्श्वभूमीवर रुग्णांना तातडीची उपचारसुविधा मिळावी या उद्देशाने सुरू करण्यात येणाऱ्या कॅथलॅब केंद्रांबाबत उद्भवलेल्या विलंबाचा मुद्दा पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी हिवाळी अधिवेशनात ठामपणे मांडला.

शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५ रोजी विधानसभेत विचारलेल्या तारांकित प्रश्नाद्वारे आमदार दाते सरांनी अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयातील कॅथलॅबचे उद्घाटन झाले असले तरी पदभरती व तांत्रिक प्रक्रियेमधील विलंबामुळे सेवा सुरू न झाल्याचे लक्ष वेधले. धुळे व बीड येथे कॅथलॅब कार्यान्वित झाल्या आहेत, मात्र अहिल्यानगरसह पुणे जिल्हा रुग्णालयातील कॅथलॅब अद्याप सुरू न होणे हा गंभीर प्रश्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार काशिनाथ दाते यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे प्रलंबित कॅथलॅब सुरू करण्यात येणाऱ्या विलंबावर सरकारचे लक्ष केंद्रीत झाले असून, परिशिष्ट क्षेत्रातील रुग्णांना तातडीने आधुनिक उपचार सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी पुढील कार्यवाही गतीमान होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

> राज्यातील एकूण २३ कॅथलॅब मंजूर असुन, अहिल्यानगर कॅथलॅबचे AERB Registration व Swab testing सुरू असून त्या प्रक्रिया पूर्ण होताच कॅथलॅब सुरू होईल, तसेच पुणे, जालना, नांदेड व कोल्हापूर येथे टर्न-की पद्धतीवर कॅथलॅब सुरू करण्यासंबंधी सुधारित प्रशासकीय मान्यता प्रक्रियेत आहे.
> **- ना. प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य.**

## कृषी विभागाच्या सुधारित परिपत्रकावर राज्यभर चर्चा

किनवट : (समर्थ गांवकरी)

राज्यातील कापूस खरेदी व्यवस्थेत मागील काही वर्षांपासून दिसणाऱ्या अडचणी आणि शेतकऱ्यांच्या सातत्यपूर्ण तक्रारी लक्षात घेऊन कृषी आयुक्तालयाने ११ डिसेंबर २०२५ रोजी महत्त्वाचे परिपत्रक जारी केले. राज्यातील सर्व कापूस खरेदी केंद्रांवर खरीप २०२५ मध्ये उत्पादित कापसासाठी प्रति हेक्टर २३६८ किलो ही एकसमान उच्चतम उत्पादकता मर्यादा लागू केली आहे. यामुळे प्रत्यक्षात जास्त उत्पादन घेणाऱ्या प्रगतशिल शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असे विभागाचे म्हणणे असले तरी, या निर्णयातून व्यापाऱ्यांना मिळणाऱ्या संभाव्य फायद्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# श्रीमद भागवत सप्ताहाचा समारोप भक्तिमय वातावरणात

■ शिक्षण, भक्ती आणि कृष्ण भावनेचा संदेश!

ठाणे : (समर्थ गांवकरी)





११ डिसेंबर २०२५ रोजी श्री अंबिका विद्यामंदिर शाळेत श्रीमद भागवत सप्ताहाचा समारोप भक्तिमय वातावरणात पार पडला. समाजरत्न नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणवाला परिवार, सौ. अमिता परेश ठक्कर, सौ. किम जितेंद्र ठक्कर, सुप्रसिद्ध कथाकार जिग्रेशभाई जयेशभाई जोशी, संत ब्रिजभूषणदास महाराज वृंदावन, दिनेशभाई हिम्मतभाई ठक्कर मालाड, हरेशभाई मीराणी, दिनेशभाई कोटक, सामाजिक कार्यकर्ते फिरोजभाई आर. पटेल, माळशेज पतपेढीचे अध्यक्ष चंद्रकांत महाराज डुंबरे, नाना महाराज देशमुख, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, संदीप मेहता, सुरेशभाई ठक्कर, राजेंद्र पुराणिक, राजेंद्र पांडे, मुख्याध्यापिका मीनाबेन जाधव, शिक्षक व हजारो भाविक उपस्थित होते.

नानजीभाई ठक्कर म्हणाले की भगवद्गीतेत श्रीकृष्णाची लीला, भक्तांचे आदर्श आणि जीवनाला पवित्र करणाऱ्या शिकवणी आहेत. आज ठाकोरजींसमोर सादर केलेले छप्पन नैवेद्य भक्तीभावाने पवित्र झाले असून देवाला तुळशीचा कोंबही श्रद्धेने अर्पण केला तरी त्याला मान्यता असते. शिक्षण हे जीवनातील सर्वात प्रभावी शस्त्र असून सुशिक्षित भारत म्हणजे समृद्ध भारत असल्याचे त्यांनी सांगितले. कथाकार जिग्रेशभाई जोशी म्हणाले की आज कथा संपते पण देवाशी नात्याची खरी सुरुवात आता होते. घर, व्यवसाय आणि नातेसंबंधात कृष्णभावना अंगीकारणे हीच खरी भागवत आराधना आहे. चंद्रकांत महाराज डुंबरे यांनी भक्ती असेल तर सर्वकाही सोपे होते, शुद्ध मनाने केलेली भक्ती प्रत्येक क्षणाला वरदान बनवते असे सांगितले. सत्संग, चांगला सहवास आणि अंतःकरणातील पवित्रता जीवन सुंदर करतात असे त्यांनी नमूद केले. यजमान नानजीभाई खिमजीभाई ठक्कर थाणावाला व त्यांच्या कुटुंबीयांनी सर्व धार्मिक विधी भक्तिभावाने पूर्ण केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.



# कुसुर सावरगाव गट सावरगाव गणातून महादेव बाळसराफ यांची उमेदवारी जाहीर

जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)

जिल्हा परिषद निवडणूकी मध्ये सावरगाव कुसुर गटा मध्ये सावरगाव गणातून माजी चेअरमन आणि सावरगाव तंटामुक्ती अध्यक्ष महादेव बाळसराफ यांची उमेदवारी निश्चित झाली आहे. सावरगाव मध्ये गाव बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.महादेव बाळसराफ यांचे सहकार क्षेत्रात आणि सावरगाव पंचक्रोशी मध्ये सामाजिक कार्य अतिशय उल्लेखनीय असल्याने सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला आहे. सावरगावचे आदर्श व्यक्तिमत्व आणि माजी पंचायत समिती सदस्य सोपान जाधव हे पंचायत समिती सदस्य होते त्यानंतर सावरगावला जिल्हा परिषद निवडणूकी मध्ये कोणतेही संधी मिळाली नाही तेव्हा सर्व सावरगाव आणि पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांनी सावरगाव मध्ये गाव बैठकीत हा झाला निर्णय, संपूर्ण सावरगाव आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ देणार पाठिंबा हा निर्णय घेतला आणि महादेव बाळसराफ यांना पंचायत समिती निवडणूक लढवण्याला सांगितले आणि आम्ही सर्व तुमच्या बरोबर आहोत असे महादेव बाळसराफ यांना सांगितले आणि शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी ह.भ.प. संतदास महाराज मनसुख,माजी तंटामुक्ती अध्यक्ष राजन बाळसराफपोलीस पाटील रुपेश जाधव,विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक वैभव कोरडे,माजी चेअरमन माऊली काचळे, रामदास नायकोडी,रमेश हिंगे, रोहिदास गोरडे ,तानाजी जुंदरे, प्रदीप बोरा,प्रवीण मनसुख, माऊली पाबळे,रामदास पाबळे, विकास जुंदरे,पांडुरंग मनसुख, किरण गाढवे,निलेश गाढवे, दादाभाऊ मनसुख,चंद्रकांत चासकर,दशरथ खिलारी,विजय ढमढेरे,बाळासाहेब गाढवे, अशोक बाळसराफ,जितेंद्र बाळसराफ,कैलास बाळसराफ, श्रीधर बाळसराफ,भानुदास काचळे असे अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'संतश्री' सारखी पुस्तके म्हणजे ज्ञानसमृद्धीची पुण्यफळेच हो

वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)

भारतीय पुराणग्रंथ ही आपली ज्ञानपीठे आहेत. त्यामध्ये श्रीमद भागवत कथा ही जीवन संजीवनी आहे.आजही उत्तम लेखन नजरेत भरणारे आहे. डॉ. बाबुराव उपाध्ये, प्रा. सौ.पल्लवी सैंदोरे यांनी संपादित केलेले 'संतश्री' सारखे पुस्तक ज्ञानसमृद्धीची पुण्यफळेच होय, असे विचार श्री अडबंगनाथ संस्थानचे मठाधिपती महंत अरुणनाथगिरीजी महाराज यांनी व्यक्त केले. श्रीरामपूरजवळील इंदिरानगर परिसरात निर्मळ परिवारातर्फे श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह सोहळा आयोजित केलेल्या प्रवचनात व 'संतश्री' पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

# मवेशी (बारववाडी) शासकीय आश्रम शाळा मराठी माध्यम येथे बनविला ऑक्सिजन पार्क

अकोले : (समर्थ गांवकरी)



तालुक्यातील आदिवासी भागात मवेशी येथे शासकीय माध्यमिक आश्रम शाळा व आम्ही पर्यावरण प्रेमी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने साठ वेगवेगळ्या प्रकारचे फळझाडे व फुल लाडे तसेच सोबत वड, पिंपळ,तुळस इ. झाडे लावून ऑक्सीजन पार्क तयार करण्यात आला. या उपक्रमात शाळेतील शिक्षक विद्यार्थी व आम्ही पर्यावरण प्रेमी ग्रुपचे सदस्य उपस्तित होते. या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाप्रसंगी जे शाळेचे विद्यार्थी होते त्यांनी ते स्वतः झाडे लावली. तसेच स्वतः त्या झाडांना पाणी घालून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच ऑक्सीजन पार्क तयार करण्यामागचा उद्देश हा पर्यावरणाचे संवर्धनाचे संस्कार जर बाल वयातच रुजवले तरच उद्याचा सुजाण नागरिक नक्कीच तयार होईल..झाडे कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात व ऑक्सिजन देतात ज्यामुळे ते आरोग्य आणि पर्यावरणासाठी एक आवश्यक ठिकाण ठरतात. व झाडे मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन बाहेर टाकतात, ज्यामुळे हवेची गुणवत्ता सुधारते आणि प्रदूषण कमी होते. ऑक्सिजन पार्कमुळे विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल. ऑक्सीजन तर भेटेलच परंतु यातून काही फळे व फुले सुद्धा भेटतील. तसेच पशुपक्षी सुद्धा त्या पार्कमध्ये येतील. या कार्यक्रमाला प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे ,डी डी पडवळे वनविभाग शेंडी, अकोले पं.समिती BDO माने साहेब, सरपंच -यमाजी भांगरे, विकास चौरे तसेच गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. तसेच या कार्यक्रमाप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब शिरसाट, प्राथमिक शिक्षिका शेख जमीला मुख्याध्यापिका पटनाईक,एकलव्य स्कूलचे प्राचार्य सहाने, वाकचौरे रोहिदास, वाकचौरे पल्लवी, वाघमारे संध्या, कानवडे अण्णासाहेब, डगळे नामदेव, पठाण सर, उमेश चोथवे मिलिंद गुंजाळ, बांगर, काताडे, देशमुख इत्यादी शिक्षक व कर्मचारी हिले उपस्थित होते.

## किनवट तालुक्यात विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रम

किनवट : (समर्थ गांवकरी)

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त किनवट तालुक्यात विविध ठिकाणी स्मरण व अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याचे स्मरण केले. दुधगाव येथील कार्यक्रमात भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संदिप केंद्रे, शिवसेना तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे, प्रमोद केंद्रे, विनोद मुंडे, दिगांबर मुंडे, ज्ञानेश्वर गीते यांनी उपस्थित राहून गोपीनाथ मुंडे यांच्या योगदानाचे स्मरण केले. याशिवाय भाजपा किनवट शहर मंडळ तर्फे मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनिवार यांच्या पुढाकाराने आ. भीमराव केराम यांच्या लोकार्पण कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हा उपाध्यक्ष बबलु नाईक, सतीष बिराजदार, विश्वास कोल्हारीकर, आ. केराम यांचे स्विय सहाय्यक प्रकाश कुडमते, जयराज वर्मा, रामु शेपुरवार, पवन जोशी यांनी सहभागी होत अभिवादन केले.

मौजे बोधडी येथे मुख्य चौकात आयोजित कार्यक्रमात जिल्हा बँकेचे माजी संचालक दिनकर दहिफळे, बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे पाटील, सुरेश घुगे, विश्वभर डोंगरे, उदय केंद्रे, आडेलु बोनगीर आदींनी स्व. मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमांमध्ये स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या लोकहितकारी कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजसेवेचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

# कडूस येथील विज्ञान प्रदर्शनात २५० प्रकल्प सादर

राजगुरुनगरः (समर्थ गांवकरी)




कडूस (ता. खेड) येथील रामभाऊ म्हाळगी विद्यालयामध्ये ५३ ने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन यशस्वीपणे पार पडले. या प्रदर्शनामध्ये २५० विज्ञान प्रकल्प सादर करण्यात आले, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले व प्राचार्य अनिल पोटे यांनी दिली.

पुणे जिल्हा परिषद,पंचायत समिती खेड, खेड तालुका मुख्याध्यापक संघ,खेड तालुका विज्ञान अध्यापक संघ आणि शिक्षण विकास मंडळ कडूस चे रामभाऊ म्हाळगी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कडूस यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनाचे आयोजन केले होते.त्यामध्ये २५० प्रकल्पांचा सहभाग होता. १५० विद्यार्थी निबंध स्पर्धेत,१४०विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेत तर २०० विद्यार्थी प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभागी झाले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन माजी आमदार दिलीप मोहिते व मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते झाले.यावेळी जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक डॉ.भाऊसाहेब कारेकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे पारितोषिक वितरण 'डायट'चे प्राचार्य महेश शेंडकर,गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले,खेड तालुका,मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय बोरकर,पालक संघाचे अध्यक्ष बापूसाहेब शेळके किशोर शेळके यांच्या हस्ते झाले. यावेळी विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब वायकर, समन्वयक विलास आदलिंगे उपस्थित होते.गट निहाय प्रथम तीन क्रमांक पुढीलप्रमाणे -प्राथमिक विद्यार्थी प्रकल्प गट साधारण(६वी ते ८वी )१)आदित्य गणेश कड-ज्ञानवर्दीनी चाकण २) सुषमा अशोक देशमुख-सरस्वती वि. औदर ३) सुधांशू विलासआदलिंगे जि.प. टाकळकर वाडी *प्राथमिक आदिवासी प्रकल्प गट १)दिव्या गणेश भांगे- शासकीय आश्रम शाळा टोकावडे २)अनुष्का निलेश धंद्रे- भाऊसाहेब राऊत वि. घोटवडी,३) सतीश गिरीश मुकणे-भीमाशंकर वि. अव्हाट प्राथमिक दिव्यांग गट १) सोफियाअफजल अलवि- क्रांतीज्योती कान्याशाळा रा.नगर २) सस्मित साईनाथ मांजरे- भैरवनाथ विद्यालय दोंदे ३) सोहम राहुल कड भैरवनाथ विद्यालय कुरुळी *माध्यमिक विद्यार्थी गट (९वी ते १२वी) १) सिद्धेश नवीन गुंडाळ -केटीइएस राजगुरुनगर २) वैभवी दत्तात्रेय देशमुख -ज्ञानवर्धिनी इंग्लिश मीडियम स्कूल माळुंगे इंगळे ३)अर्जुन तानाजी गारगोटे -रामभाऊ म्हाळगी विद्यालय कडूस माध्यमिक विध्यार्थी आदिवासी गट १) नैतिक रवींद्र वाळुंज-भीमाशंकर विद्यालय आव्हाट * माध्यमिक दिव्यांग गट १) भक्ती हनुमंत उपासे -संत मुक्ताबाई वि.सोळू २) कोमल काळू चव्हाण-श्री ज्ञानेश्वर वि.आळंदी ३) साईराज निलेश आरुडे -त्रिमूर्ती वि.तिन्हेवाडी प्राथमिक शिक्षक गट शैक्षणिक प्रतिकृती १) भराडे के.एस.- शिवाजी विद्यामंदिर चाकण २) रंजना सोनवणे-जि प शाळा महाळुंगे इंगळे ३) रोहिणी बाळासाहेब लोंढे-जि. प.शाळा कोरेगाव बु !माध्यमिक शिक्षक गट १)सौ.वैशाली प्रमोद काळे -रामभाऊ म्हाळगी वि. कडूस २) श्रीम. सुजाता गोपाळ थिगळे- राजे शिवछत्रपती विद्यालय चांदुस ३)सौ. पांडे रुचिरा देविदास- ज्ञानवर्धिनी इंग्लिश मीडियम स्कूल माळुंगे प्रयोगशाळा परिचर गट १)श्री. स्वप्निल बाळासाहेब लोखंडे-नवीन मा.वि.मरकळ २)श्री.लक्ष्मण शिवाजी शिंदे-श्री.सुमंत माध्य.वि.पिंपरी बुद्रुक ३)श्री. गव्हाणे एस.एस.-श्री. शरदचंद्र विद्यालय वडगाव घेनंद. दोन दिवसीय प्रदर्शनाचे संयोजन गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य अनिल पोटे,पुणे जिल्हा क्रीडा शिक्षक संघटनेचे सचिव रामदास रेटवडे, सर्व विस्तारअधिकारी ,केंद्रप्रमुख,पुणे जिल्हा गणित अध्यपक संघाचे कोषाध्यक्ष योगेश माळशिरसकर,सचिव सतीश देवरे,अतुल सवाखंडे, रविंद्र घनवट, विलास दौंडकर,कल्पना गायकवाड, दिगंबर एवळे,श्यामल सोनवणे, कल्पना घोलप,सदाशिव खैरे,वैशाली काळे,राजश्री ढमाले,सविता भोजने,प्रियांका ढवळे रोहिणी जावळे, उषा पोटे,दत्तात्रय येवले अजिनाथ केदार, बबन डांगले,अभिजित वाजे,तानाजी कोळेकर जालिंदर पवळे यांनी केले. प्रवीण काळे व तुषार वाटेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करुन आभार मानले.

# ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर फॅशनला घेऊन जातो फास्ट लेनमध्ये

## फॅशनच्या पुढील हालचालीचे संकेत देणाऱ्या मोटरकोरच्या गतिशील प्रदर्शनासह हा टूर वेगाने पोहोचला जयपूरमध्ये




मुंबई : (समर्थ गांवकरी)

ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर आता पुढे सरकला जयपूरमध्ये, उच्च दर्जाची-फॅशन आणि मोटरस्पोर्टच्या एकत्रिकरणामध्ये रूपांतरित झाला आहे. सीमा पार करून, जयपूर आवृत्तीने मोटरस्पोर्ट्स-प्रेरित डिझाइन, ग्लॅमरस परफॉर्मन्स वेअर आणि उच्च दर्जाचे-ऑक्टेन फॅशन शोकेसचा शोध लावला, ज्यावरून 'फॅशनचे पुढचे पाऊल' काय असेल ते लक्षात येते ते म्हणजे - वेगाने आणि अचूकतेने पुढे धावणे. फॅशन डिझाईन कौन्सिल ऑफ इंडिया (FDCI) च्या सहकार्याने, या शोकेसने रनवेला स्टाईल आणि शक्तीच्या हाय-स्पीड स्वरूपात पुन्हा मांडले आहे. सुप्रसिद्ध डिझायनर्स नम्रता जोशीपुरा आणि अभिषेक पाटणी यांनी उच्च दर्जाच्या-ऑक्टेन मोटरकोर सौंदर्यशास्त्राची पुनर्व्याख्या केली, रेसिंग संस्कृतीचे स्टेटमेंट-मेकिंग फॅशनमध्ये रूपांतर केले. बॉलीवूड स्टार हरनाज संधू ने अंतिम शोस्टॉपर म्हणून या रनवेचे नेतृत्व केले, ग्लॅमर आणि वेग दोन्ही एकत्र आणले, तर रॅप सेन्सेशन रफ्तारने रात्रीचा शेवट शोच्या धमाकेदार उत्साहाशी जुळणाऱ्या एका अद्वितीय अतीउत्साही सादरीकरणाने केला. शो तीन-लॅप रनवे अनुभवाने उलगडला ज्याने स्टेजला एका आकर्षक मोटरस्पोर्ट एरिनामध्ये बदलले. स्टार्ट लाईनच्या रेसिंग सिल्हूटपासून ते पिट लेनच्या क्रोम-चलित स्लीक आणि टॅक्टिकल लूकपर्यंत, द ग्लॅम नाईटच्या उच्च दर्जाच्या-ऑक्टेन ग्लॅमरपर्यंत, एका आकर्षक स्पोर्ट कार स्टंटने याचा शेवट झाला ज्याने शोचे संपूर्ण वातावरण उत्साही बनले. या अनुभवाने भारताच्या सांस्कृतिक आणि क्रिएटिव्ह क्षेत्राला बळकटी मिळाली – जे वेगवान, तीक्ष्ण आणि अटळ, आहे आणि त्यामध्ये ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरला या फॅशनला अभूतपूर्व वेगाने पुढे नेणारे इंजिन म्हणजेच महत्त्वाचा दूवा म्हणून स्थान मिळाले आहे. देबश्री दासगुप्ता, CMO, पेर्नोड रिकार्ड इंडिया म्हणाल्या "ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर नेहमीच फॅशन आणि सांस्कृतिक संवादांना आकार देण्यात आघाडीवर राहिला आहे. टूरची जयपूर आवृत्ती उच्च दर्जाचे-ऑक्टेन मोटरस्पोर्ट आणि ग्लॅमरस उच्च दर्जाचे-फॅशनच्या जगाचे एकत्रिकरण करून, धाडस, स्टाईल आणि नाविन्यपूर्णतेचा उत्सव साजरा करणारा एक मनमोहक अनुभव तयार करून, त्या दृष्टिकोनाला आणखी पुढे घेऊन जाणार आहे."

## पुण्यातील व्हीनस ट्रेडर्स व सीटी पुंडोल तर्फे अलिशान लेखन उपकरणे आणि ॲक्सेसरीज साठी

# व्हिडोल या प्रशस्त दालनाचे उद्घाटन



पुणे : (समर्थ गांवकरी)

समृध्द वारसा असलेल्या पुण्यातील व्हीनस ट्रेडर्स व सीटी पुंडोल तर्फे अलिशान लेखन उपकरणे आणि ॲक्सेसरीज साठी व्हिडोल या प्रशस्त दालनाचे एमजी,रोड येथे उद्घाटन करण्यात आले आहे. व्हीनस ट्रेडर्स हे स्टेशनरी, कला साहित्य आणि लेखन उपकरणांसाठी लोकप्रिय ठिकाण आहे,तर सीटी पुंडोल हे लक्झरी घड्याळे,कलाकुसर,कारागिरी आणि प्रिमियम रिटेल अनुभवांसाठी प्रसिध्द असलेले व 117 वर्षांचा समृध्द वारसा असलेला लोकप्रिय ब्रँड आहे. या दालनाच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द भारतीय वास्तुविशारद,शिक्षणतज्ञ प्रा. यशवंत पिटकर याबरोबरच व्हीनस ट्रेडर्स चे सुरेंद्र करमचंदानी,प्रमोद करमचंदानी,निखिल करमचंदानी व सीटी पुंडोलचे कावस पुंडोल, अविवा पुंडोल व होरमुझ पुंडोल आदी मान्यवर उपस्थित होते. व्हिडोल या दालनाच्या माध्यमातून परंपरा,लक्झरी व आधुनिक अभिजाततेचा शक्तीशाली समन्वय दर्शवण्याचा प्रयत्न आहे.या प्रशस्त दालनात लेखन उपकरणे व ॲक्सेसरीजचे 20 हून अधिक आंतरराष्ट्रीय व प्रिमियम ब्रँडसची उत्पादने असून ग्राहकांना अतुलनीय अनुभव प्रदान करतील. व्हिडोल हे अशा प्रकारचे पुण्यातील पहिले बुटीक कॉन्सेप्ट स्टोअर असून कालातीत कारागिरी आणि लेखनाचा आनंद साजरा करते.

# एचडीएफसी टेक इन्नोव्हेटर्स २०२५ चे यशस्वी आयोजन




मुंबई : (समर्थ गांवकरी)

एचडीएफसी बँक ग्रुप तर्फे त्यांच्या एचडीएफसी टेक इन्नोव्हेटर्स २०२५ च्या चौथ्या पर्वाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांच्याकडून सहा क्षेत्रातील आणि उदयोन्मुख महिला संस्थापकांसाठीच्या दोन विशेष पुरस्कारांच्या माध्यमातून १० विजेत्यांची घोषणा करण्यात आली. एचडीएफसी इन्नोव्हेटर्स २०२५ चे आयोजन हे एचडीएफसी बँक, एचडीएफसी कॅपिटल आणि एचडीएफसी एएमसी यांच्या सह ग्रुपच्या अन्य सहयोगी कंपन्या एचडीएफसी लाईफ, एचडीएफसी अर्गो, एचडीएफसी सिक्युरिटीज आणि एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस यांच्या संयुक्त विद्यमाने देशातील वाढत्या स्टार्ट अप इको सिस्टमला चालना देण्याच्या उद्देशाने करण्यात आले होते. या वर्षीच्या पर्वाला देशभरांतील २९० शहरांतून आलेल्या १६०० हून अधिक स्टार्टअप्स नी प्रतिसाद दिला होता.

स्टार्टअप इकोसिस्टम ला चालना देण्यासाठी एचडीएफसी टेक इन्नोव्हेटर्सच्या माध्यमातून स्टार्टअप्सचा गौरव करण्यासाठी एक मंच उपलब्ध करुन दिला जातो आणि एचडीएफसी ग्रुप कंपन्यांना त्यांच्या बरोबर काम करुन एकत्रितपणे उत्पादने आणि उपायांची निर्मिती करणे शक्य होते. या उपक्रमाच्या माध्यमातून उदयोन्मुख स्टार्ट अप्स ना ओळखून नाविन्यपूर्ण उपायांची निर्मिती करुन त्यांच्या व्यावसायिक प्रवासाला चालना मिळते. या वर्षीच्या सुरुवातीस एचडीएफसी बँके तर्फे क्यून्यू लॅब्स मध्ये गुंतवणूक केल्याची घोषणा करण्यात आली होती, त्यांच्याकडून प्रथमच एन्ड टू एन्ड क्वांटम सेफ सायबर सुरक्षा मंचाची निर्मिती केली गेली.

# फिनेस्टाचा पुण्यात विस्तार

पुणे (समर्थ गांवकरी)

फिनेस्टा, भारतातील प्रिमियम खिडक्या आणि दरवाजे बनविणाऱ्या विश्वसनीय ब्रॅन्डने , पश्चिम विभागातील आपले अस्तित्व अधिक बळकट करण्याकरिता, पुण्यामध्ये नव्या आत्याधुनिक शोरूमचे उद्घाटन केले. होम शिल्ड ग्लास सोल्युशन्सद्वारे संचालित,खराडी, पुणे येथे सुरू करण्यात आले आहे. या नव्या उद्घाटन झालेल्या शोरूममध्ये फिनेस्टाचा उत्पादनांचा भव्य असा पोर्टफ़ोलियो असेल, ज्यात uPVC आणि ॲल्युमिनियम खिडक्या आणि दरवाजे, भक्कम असे पॅनल डोअर, फॅसेड आणि प्रिमियम गुणवत्ता असलेली हार्डवेअर उत्पादने बघायला मिळणार आहेत. घर मालक, आर्किटेक आणि डेव्हलपर्सचा अपेक्षा पूर्ण करणाऱ्या रचना इथे असतील.

# हंगामा ओटीटी ने सादर केली 'विन्नी की किताब'

## स्वतःची कहाणी धैर्याने पुन्हा लिहिणाऱ्या विन्नीची कथा

मुंबई : (समर्थ गांवकरी)

भारतातील अग्रगण्य हिंदी स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीवर 11 डिसेंबर 2025 पासून नवीन ओरिजिनल सीरिज 'विन्नी की किताब' स्ट्रीमिंगला सुरू होत आहे. सहा भागांच्या या धाडसी मालिकेत आलिशा पनवार नव्या रूपात दिसणार असून त्यांच्यासोबत अभिषेक कपूर, संजय गगनानी, मानसी जैन आणि अफरीन अल्वी यांसारखे कलाकारही झळकणार आहेत.

कसोलच्या शांत आणि निसर्गरम्य वातावरणात घडणारी 'विन्नी की किताब' ही मालिका मालिका विन्नीची कथा सांगते. विन्नी ही एका छोट्या गावातील, शांत स्वभावाची मुलगी आहे. विन्नी तिच्या मनातील सगळ्या इच्छा आणि कल्पना एका खासगी डायरीत लिहित असते, आणि कधीच कल्पना करत नाही की यामुळे तिच्या आयुष्यात मोठा गोंधळ निर्माण होईल. पण जेव्हा तिचे अतिशय खाजगी विचार अनपेक्षितपणे जगासमोर उघड होतात, तेव्हा विन्नीसमोर एक मोठा निर्णय उभा राहतो- तो म्हणजे गप्प बसून सर्व सहन करायचे की आपली स्वतःची कहाणी परत मिळवण्यासाठी धैर्याने उभे राहायचे.

इच्छा आणि सन्मान, लाज आणि धैर्य यांच्यामध्ये अडकलेली विन्नी स्वतःला समजून घेण्यासाठी एक नवा प्रवास सुरू करते. या प्रवासात ती समाजाच्या मतांना सामोरी जाते आणि स्वतःची कहाणी स्वतः सांगण्याचे धैर्य मिळवते.




संजिव लांबा, एक्झिक्युटिव्ह प्रोड्युसर, हंगामा डिजिटल मीडिया, म्हणाले: "'विन्नी की किताब' वेगळी आहे कारण ती अशा आयुष्यांकडे प्रकाश टाकते, ज्यांकडे लोक सहसा दुर्लक्ष करतात. अनेक स्त्रिया त्यांच्या आत संपूर्ण विश्व लपवून ठेवतात. ही मालिका त्या आतल्या मनाच्या जगाला आणि त्यातून निर्माण होणाऱ्या निवडींना मोकळी जागा देते."

विन्नीची भूमिका साकारणारी आलिशा पनवार म्हणते: "विन्नी ही माझ्यासाठी सर्वांत आव्हानात्मक भूमिका आहे. बाहेरून ती शांत आणि संयमी दिसते, पण आत तिच्या मनात भावनांचे आणि संघर्षाचे वादळ आहे. तिची शांतता, ताकद आणि बंडखोरपणा दाखवणे ही भूमिका साकारताना मला खूप प्रेरणा आणि समाधान मिळाले."

विन्नीचा पती नवनीत नौटियालची भूमिका करणारा अभिषेक कपूर म्हणतो: "या मालिकेचे खास वैशिष्ट्य म्हणजे ती दाखवते की शांत दिसणाऱ्या आयुष्यातही किती मोठे संघर्ष दडलेले असतात. विन्नीच्या बदलाच्या प्रवासाचा भाग होणे आणि त्यांच्या नात्याच्या भावनिक गुंतागुंतीचा अनुभव घेणे माझ्यासाठी खूप रोचक अनुभव होता."

## अंदमान आणि निकोबार येथील विजयापुरम येथे "सागरा प्राण तळमळला" या गीताच्या

# ११६ व्या वर्षपूर्तीनिमित्त भव्य ऐतिहासिक सोहळा



श्री विजयापुरम, अंदमान आणि निकोबार : (समर्थ गांवकरी)

"सागरा प्राण तळमळला" या अमर्त्य अशा काव्यपंक्तींनी लाखो भारतीयांच्या हृदयात त्यावेळी राष्ट्रवादाची वात जागवली, या गोष्टीला म्हणजेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी या ज्या पंक्ती समुद्राच्या लाटांच्या साक्षीने लिहिल्या त्या गोष्टीला आज ११६ वर्षे होऊन गेली आहेत.

या ऐतिहासिक अशा क्षणाच्या निमित्ताने मुंबई येथील व्हॅल्यूएबल ग्रुपचे संस्थापक श्री अमेय हेटे यांनी "सागरा प्राण तळमळला" या भव्य अशा सोहळ्याचे आयोजन १२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी तीन वाजता अंदमान आणि निकोबार येथील श्री विजयापुरम येथे केले होते. या भव्य अशा सोहळ्यात सावरकरांच्या तेजस्वी आणि भव्य पुतळ्याचे अनावरण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूज्य डॉक्टर मोहन भागवत यांच्या हस्ते आणि केंद्रीय गृहमंत्री श्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

माननीय मोहन भागवत आणि माननीय अमित शहा हे हृद्य आणि सार्वजनिक अशा या सोहळ्यात एकत्र आल्याने एक दुर्मिळ योग साध्य झाला. एडमिरल (नि)देवेंद्र कुमार जोशी, माननीय लेफ्टनंट गव्हर्नर, श्री विजयापुरम आनंद अंदमान निकोबार आणि महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ऍडव्होकेट आशिष शेलार हे यावेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी व्हॅल्यूएबल ग्रुपचे संस्थापक अमेय हेटे यांचीसुद्धा उपस्थिती होती.

हा पुतळा म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रखर राष्ट्रवादाचे, अजोड त्यागाचे आणि निडर विचारसरणीचे प्रतीक आहे. या पुतळ्याची रचना प्रख्यात शिल्पकार श्री राम सुतार यांची आहे. त्यांना नुकतेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या अनोख्या अशा उपक्रमाबद्दल बोलताना व्हॅल्युएबल ग्रुपचे संस्थापक श्री अमेय हेतेहोते म्हणाले,"

हा सोहळा म्हणजे केवळ एक सांस्कृतिक सोहळा नसून ही भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासाला वाहिलेली एक मानवंदना आहे. हा भविष्यातील आपल्या पिढ्यांमध्ये राष्ट्रवाद आणि देशभक्ती जागृत करण्याचा एक प्रामाणिक छोटासा प्रयत्न आहे.

# डॉ. आंबेडकर करंडक हॉकी स्पर्धेसाठी १४ संघामध्ये चुरस

पुणे : (समर्थ गांवकरी)

पिंपरीतील नेहरूनगर येथील मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर १३ ते १८ डिसेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या प्रतिष्ठित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉकी स्पर्धेत १४ संघांमध्ये चुरस आहे. सहभागी संघांमध्ये १३ वरिष्ठ (सीनियर) आणि एका बाहेरील (मुंबई) संघाचा समावेश आहे. वरिष्ठ संघांमध्ये क्रीडा प्रबोधिनी; जीएसटी आणि कस्टम्स, पुणे; आयकर, पुणे; एक्सलन्सी अकादमी; विक्रांत हॉकी अकादमी; फ्रेंड्स युनियन क्लब; पुणे मॅजिशियन; पीसीएमसी अकादमी; पूना हॉकी अकादमी; खडकी हॉकी अकादमी; किड्स इलेव्हन; पुणे सिटी पोलिस; हॉकी लव्हर्स स्पोर्ट्स क्लब आणि मुंबईचा रिपब्लिकन स्पोर्ट्स क्लब असे संघ खेळतील.

# साली मोहब्बतच्या स्क्रीनिंगसाठी कलाकारांची उपस्थिती

मुंबई : (समर्थ गांवकरी)

ZEE5 ची घट्ट खिळवून ठेवणारी नवीन रोमांचक कथा साली मोहब्बत आता स्ट्रीम केली जात आहे आणि यापूर्वीच ती चर्चेचा विषय होती. टिस्का चोप्राने याचे दिग्दर्शन केले असून या चित्रपटात नाट्य, फसवणूक आणि गुंतवळ्यात सापडलेल्या नात्यांचा मिलाफ पहायला मिळत आहे. राधिका आपटे व दिव्येंदू यांच्या प्रभावी अभिनयाने त्यात रंगत भरली आहे.

रिलीजच्या आधी, ZEE5 ने मुंबईत एका-मागे-एक अशा खास स्क्रिनिंग्ज आयोजित केल्या असून इंडस्ट्री मधील काही दिग्ग्ज कलाकार त्यात सामील होते. या कार्यक्रमाला निर्माते - मनीष मल्होत्रा, त्यातील कलाकार- राधिका आपटे, दिव्येंदू, अंशुमान पुष्कर, सौरसेनी मैत्रा आणि दिग्दर्शनात पदार्पण करणाऱ्या टिस्का चोप्रा, हे सर्वजण उपस्थित होते. सोबतच करण जोहर, काजोल, भूमी पेडणेकर,




फराह खान, उर्मिला मातोंडकर, नशरत भरुचा, रासिका दुग्गल, अभिषेक बॅनर्जी, वरुण शर्मा, हीना खान, करण टॅकर आणि इतर जबरदस्त कलाकार मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते.

स्क्रीनिंग्जना भरभरून प्रशंसा मिळाली आणि पाहुण्यांनी चित्रपटाची कुशाग्र कथा सांगण्याची शैली, बारकाईपूर्वक केलेले दिग्दर्शन आणि लक्षवेधक अभिनयाची स्तुती केली. या प्रचंड भावनिक रोमांचक कथेभोवती निर्माण होणारी उत्सुकता, या उद्योगाने दिलेल्या स्नेहपूर्ण प्रतिसादामुळे वाढलेली दिसून येते.

काजोलने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर जाऊन चित्रपटाबद्दल आपली समीक्षा सर्वांना कळविली. तिने चित्रपटाचे कौतुक करत लिहिले की, "किती छान मजेदार गूढ रोमांचक कथा आहे ही! नक्कीच पाहिली पाहिजे. पूर्ण टीमचे आणि विशेषतः अतिशय उत्कृष्ट कामगिरीसाठी @ radhikaofficial चे खूपखूप अभिनंदन." फराह खानने इंस्टाग्रामवर जाऊन लिहिले की, "मला @manishmalhotra05 या व्यक्तीचे आणि त्याच्या आगामी चित्रपट #saalimohabbat @ ZEE5 चे खूप कौतुक वाटते."

दिग्दर्शिका टिस्का चोप्रा या चित्रपटाला मस्ट वॉच बनवणाऱ्या कारणांविषयी बोलताना म्हणाल्या, "अधिकांश रोमांचक कथेचा भर बाह्यांगावर, शस्त्रावर आणि उद्देशावर असतो.

# सॅमसंगकडून नवीन नाविन्यता दृष्टिकोनाचे अनावरण



गुरूग्राम : (समर्थ गांवकरी)

सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज नवीन धोरणात्मक दृष्टिकोन #PoweringIn novationforIndia चे अनावरण केले, जो देशातील ब्रँडच्या विकासाच्या पुढील टप्प्यामध्ये ग्राहक-केंद्रित नाविन्यता, भारतीय टॅलेंट आणि भारत-नेतृत्वित उत्पादन विकासाला प्राधान्य देतो.

भारतातील कार्यसंचालनांच्या 30 वर्षांना साजरे करत सॅमसंगचा नवीन दृष्टिकोन भारतातील डिजिटल परिवर्तन, मेक इन इंडिया उत्पादन महत्त्वाकांक्षा आणि नाविन्यता-संचालित आर्थिक विकासामधील दीर्घकालीन सहयोगी म्हणून त्यांची कटिबद्धता अधिक प्रबळ करतो. 1995 मध्ये भारतात प्रवेश केल्यापासून सॅमसंगने घरगुती मनोरंजनाला नव्या उंचीवर नेलेले टेलिव्हिजन्स लॉंच करण्यापासून नोएडामध्ये जगातील सर्वात मोठे मोबाइल उत्पादन प्लांट स्थापित करण्यामध्ये विस्तार केला आहे, तसेच भारतात डिझाइन केल्या जाणाऱ्या नाविन्यतांना चालना देत आहे, जे आता त्यांच्या जागतिक परिसंस्थेला पाठिंबा देतात.

# साथी पोर्टल कार्यप्रणाली व कीटकनाशक हाताळणीविषयी प्रशिक्षण संपन्न



ठाणे : (समर्थ गांवकरी)

कृषी विभाग, जिल्हा परिषद ठाणे , कृषि विभाग, महाराष्ट्र शासन व स्पेक्ट्रम इथर्स लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी सेवा केंद्र चालक, गुणनियंत्रण निरीक्षक तसेच बियाणे उत्पादक कंपन्यांसाठी आयोजित करण्यात आलेले साथी पोर्टल कार्यप्रणाली आणि कीटकनाशकांच्या सुरक्षित हाताळणी व फवारणीविषयीचे प्रशिक्षण दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी बी. जे. हायस्कूल येथे यशस्वीपणे पार पडले.

मा. कृषी आयुक्त यांच्या आदेशानुसार जिल्हाभरातील कृषी सेवा केंद्रांच्या कामकाजात डिजिटल प्रणालीचा अधिक कार्यक्षम वापर व्हावा तसेच शेतकऱ्यांपर्यंत सुरक्षित व गुणवत्तापूर्ण कृषी सेवा पोहोचाव्यात, या उद्देशाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणास कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर, मोहीम अधिकारी महेश बनकर, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक बालाजी शिंदे, जिल्हा व्यवस्थापक, RCF विकास कांबळे, स्पेक्ट्रम इथर्स लिमिटेड उत्तम मगर, दीपक कोळी, हेमंत सूर्यवंशी, प्रतिनिधी, व्हिजन टेक सुहास पाटील, अध्यक्ष, ठाणे जिल्हा ॲग्रो डीलर्स असोसिएशन समीर ठाकरे, तालुकास्तरावरील गुणवत्ता नियंत्रण विभागातील अधिकारी, जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्रांचे प्रतिनिधी व विक्रेते उपस्थित होते.

मोहिम अधिकारी श्री. महेश बनकर यांनी साथी पोर्टलवरील बियाणे साठवणूक, वितरण, विक्री प्रक्रियेची पद्धत याबाबत PowerPoint प्रेझेंटेशनद्वारे सविस्तर माहिती दिली.

तसेच, बियाणे विक्री करताना येणाऱ्या अडचणी, पोर्टलवरील नोंदी कशा योग्यरीत्या कराव्यात, प्रणालीतील सामान्य समस्यांचे निराकरण, रब्बी व खरीप हंगामासाठी बियाणे विक्री करताना घ्यावयाची दक्षता याबाबत तपशीलवार मार्गदर्शन करण्यात आले. व्हिजन टेकचे प्रतिनिधी सुहास पाटील यांनी POS मशीनवर खत विक्री करताना उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींवर प्रात्यक्षिक दिले. POS प्रणालीचा योग्य वापर करून पारदर्शक व अचूक खत-वितरण कसे करावे याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. स्पेक्ट्रम इथर्स लिमिटेडचे प्रतिनिधी हेमंत सूर्यवंशी यांनी कीटकनाशकांची सुरक्षित साठवणूक, फवारणी करताना शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी, वैयक्तिक संरक्षण साधनांचा वापर, अति, चुकीचा किंवा अनधिकृत कीटकनाशकांचा वापर टाळणे, वातावरण, वारा, तापमान यांचा फवारणीवरील परिणाम, दुर्घटना टाळण्यासाठी महत्त्वाचे सुरक्षा नियम या मुद्द्यांवर सविस्तर माहिती दिली.

कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांनी उपस्थित विक्रेत्यांना युरिया खत फक्त शेतकऱ्यांनाच विकावे, गैरशेती वापरासाठी खत विक्री आढळल्यास रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ व अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कडक कारवाई करण्यात येईल, अशा सुचना दिल्या. तसेच कोकणातील पिकांसाठी शासन प्रमाणित कीटकनाशकेच विक्री करावीत. विक्री केंद्रांमध्ये कीटकनाशकांचा साठा सुरक्षित आणि नियमांनुसार ठेवावा असे मार्गदर्शन ही यावेळी केले.

या कार्यशाळेत शेतकऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या 'कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी' या घडीपत्रिका व साथी पोर्टल माहिती पुस्तिकेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान सर्व विक्रेत्यांना फवारणी किट देखील वितरित करण्यात आले.